
# इंडोनेशिया

श्रीकांत



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा०वा०
दा. क्र. 3229

IRBK-0103281
IRBK-0103281

*रिपब्लिक*

# इंडोनेशिया शरिकत

लेखक

चन्द्रकान्त ताम्हाणे
बी. ए.

ग्रंथ संग्रहालय
२९००९
आ. वा.
११८१
नों. दि. ३१।३।६९
म. ग्रं. सं. ठाणे, बालग्रंथ शाखा.
वा. क्र. 329 नों. दि.
वि. 01-01 क्र.
IRBK-0103281
IRBK-0103281

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

: मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

किंमत एक रुपया

आवृत्ति पहिली
१९५०

८ ( १९५० )

# प्रस्तावना

३१ डिसेंबर १९४९ रोजीं इंडोनेशिया स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याच्या प्रत्येक उपासकास त्यामुळें आनंद वाटणें साहजिकच आहे. मात्र भारत-वासीयांस या घटनेंमुळें विशेष आनंद झाला. अलीकडील कांहीं दिवसांत भारत व इंडोनेशिया यांच्या जिव्हाळ्याच्या प्राचीन संबंधास उजाळा मिळाला होता. त्यांतच इंडोनेशियास स्वातंत्र्य मिळविण्यास भारताचें प्रयत्न अंशत कां होईना कारणीभूत झाले होते.

१७ ऑगस्ट १९४५ रोजीं डॉ. सोकार्नो यांनीं इंडोनेशियन जनतेच्या वतीनें स्वातंत्र्य पुकारलें. त्या वेळीं भारत पारतंत्र्यांत असल्यामुळें भारतीय पुढाऱ्यास नवजात इंडोनेशियन स्वातंत्र्याचें स्वागत करण्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीच गोष्ट त्यांच्या हातीं नव्हती. यामुळें डचांनीं या स्वतंत्र राष्ट्रांवर केलेल्या अन्याय्य आक्रमणास नैतिक विरोध करण्यापलीकडे, त्यांना कांहीं करतां आलें नाहीं. त्यानंतर हंगामी सरकारांत पं. नेहरू मंत्री असतांना त्यांनीं हिंदी सैन्य डचांसाठीं लढणार नाहीं अशी जाहीर ग्वाही दिली होती. १५ ऑगस्ट १९४७ ला भारतहि स्वातंत्र झाला.

भारत स्वतंत्र झाल्यावर इंडोनेशियन स्वातंत्र्यावर डचांनीं दोनदां हल्ले केले. दोन्हीं वेळां भारतानें डचांविरुद्ध आंतरराष्ट्रीय चव्हाट्यावर म्हणजे सुरक्षा मंडळाकडे तक्रार केली, व इंडोनेशियास न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या वेळीं तर पं. नेहरू यांनीं दिल्ली येथें आशियांतील १९ राष्ट्रांची एक मोठी परिषद भरविली, व इंडोनेशियाच्या मागें आशियांतील सर्व राष्ट्रें खडीं आहेत हें जगाला विशेषतः अँग्लो–अमेरिकनांना व डचांना दाखवून दिलें. याचाच परिणाम होऊन सुरक्षा मंडळानें डचांविरुद्ध कडक

निषेधाचा ठराव पास केला व डचांनींहि काळ वेळ ओळखून इंडोनेशियन पुढाऱ्यांशीं समझोता केला.

इंडोनेशिया व हिंदुस्थान यांचे सांस्कृतिक संबंध अगदीं पुरातन काळापासून कसे चालत आले आहेत याचें थोडक्यांत विवेचन या पुस्तिकेंत आलें आहे. त्यांतच या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्यांत भारताचे प्रयत्न कारणीभूत झाले असल्यामुळें हे संबंध जास्तच निकटचे झालें आहेत. स्वतंत्र इंडोनेशियांत भारताचे वकिल म्हणून डॉ. सुब्बरॉयन या पहिल्या दर्जाच्या मुत्सद्याची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांच्या स्वातंत्र्य सोहाळ्यांत भारत सरकारच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर या हजर राहिल्या व त्यांनीं या स्वातंत्र्यास यश चिंतिलें. भारत स्वतंत्र झाला त्या वेळीं इंडोनेशियन पुढारी आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं जीवनमरणाच्या झगडयांत गुंतलें होते. त्यामुळें लांबून अभिनंदन करण्याशिवाय इंडोनेशियन पुढाऱ्यांस कांहींच करतां आलें नाहीं. २६ जानेवारीस भारत प्रजासत्ताक झाले त्या वेळीं मात्र इंडोनेशियन संघराज्याचें अध्यक्ष डॉ. सोकार्नो हे या सोहाळ्यास सपत्नीक हजर राहिले. प्रत्येक कार्यक्रमांत त्यांनीं उत्साहानें भाग घेतला.

प्राचीन काळापासून प्रत्येक बाबतींत मार्गदर्शनासाठीं इंडोनेशियन जनता भारताकडे पहात आली आहे. प्राचीन काळीं तेथील अनेक पंडित भारतांत येत व भारतांतील नवनवीन गोष्टी शिकून परतत. हा पायंडा इंडोनेशियन पुढाऱ्यांनीं अद्यापहि कायम ठेवला आहे. स्वातंत्र्य–लढ्याची स्फूर्तीहि त्यांनीं भारतापासून, विशेषतः महात्मा गांधी व पं. नेहरू यांच्यापासून घेतली आहे. सध्यांचे इंडोनेशियन पुढारी हॉलंडमध्यें शिक्षण घेत असतांना १९२७ सालीं झालेल्या ‘ ॲन्टी कलोनियल लीग ’ मध्यें त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. याच वेळीं सध्यांचे इंडोनेशियन पंतप्रधान

डॉ. हाटा व पं. नेहरू यांची ओळख झाली. आतां तर या ओळखीचें रूपांतर अगदीं गाढ मैत्रींत झालें आहे. इंडोनेशियांतील राजकीय क्रांतीचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यावर स्थापन झालेल्या सर्वपक्षीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. सूटोमो हे स्वतः वर्धा येथें येऊन महात्मा गांधींची भेट घेऊन त्यांच्याशीं सल्लामसलत करून परतले होते. स्वातंत्र्यानंतरच्या काळांत ही ये-जा चांगलीच वाढली आहे.

पहिल्या आंतरआशिया परिषदेस इंडोनेशियाचे त्या वेळचे पंतप्रधान डॉ. शहरीर हजर होते. त्यानंतर डचांच्या आक्रमण काळांतील कोंडींत ते अडकून पडले होते. अशा वेळीं हिंदी वैमानिक श्री. पाटनाईक यांनीं डॉ. शहरीर यांना डचांची कोंडी फोडून बाहेर काढलें. डॉ. शहरीर हे बाहेर पडल्यामुळें जगभर दौरा काढून त्यांना डचांविरुद्ध वातावरण तापवतां आलें. या वेळींहि पं. नेहरूंशीं चर्चा करून त्याचा सल्ला घेऊनच डॉ. शहरीर यांनीं पुढील धोरण आंखलें होतें. डचांच्या याच आक्रमणाला भूमिगत राहून प्रतिकार करणारे डॉ. हाटाहि एकदां दिल्लीस येऊन पं. नेहरूंची भेट घेऊन परतले होते अशी माहिती आतां बाहेर आली आहे. डचांनीं तिसऱ्या आक्रमणानंतर या पुढारी मंडळींची सुटका केल्या-वर डॉ. हाटा फिरून एकदां दिल्लीस आले. डचांशीं कोणत्या मुद्यांवर तडजोड करावी यासंबंधीं पं. नेहरूंचा सल्ला घेऊनच ते हॉलंडला गेले, व स्वातंत्र्य मिळवून परतले.

डॉ. सोकार्नो प्रजासत्ताक सोहाळ्यांत भाग घेण्यासाठीं आले असतां दिल्ली नभोवाणीवरून भाषण केलें. त्यांतील बरेचसे शब्द आपणांस परिचित असेच होते. खुद्द पं. नेहरू यांनींहि ही गोष्ट मान्य केली आहे. 'भाषा इंडोनेशिया' या इंडोनेशियाच्या राष्ट्रभाषेंत अनेक संस्कृत व संस्कृतोद्भव शब्द आहेत हेंच यांचें कारण आहे. त्यांच्याकडील मेघावती,

कर्णावती, कार्तिनी वगैरे नांवें तर आपल्याइकडील स्त्रियांचीं वाटतात. इंडोनेशियांत प्राचीन हिंदी संस्कृतीचे अनेक अवशेष आहेत, कित्येक प्रचंड देवळें आहेत, बुद्धाच्या अतिप्रचंड मूर्तीहि आहेत. याचें संशोधन करण्यासाठीं भारतीय संशोधकांची एक तुकडी तिकडे गेली आहे. तेथील नाटकांचे प्रकार, नृत्यांचे प्रकार, खेळ, वेषभूषा वगैरे बाबतींतहि बरेंचसें साम्य आहे. अशा रीतीनें मूळचेच स्नेहाचे संबंध आतां जास्त जास्त स्नेहाचे होत जातील यांत शंका नाहीं. ' इंडोनेशियांत आम्हांस हिंदी शिकविण्यासाठीं मौलाना आझादांनीं शिक्षकांचा एक ताफा पाठवावा ' असे विनोदी उद्गारहि डॉ. सोकार्नो यांनीं याच प्रेमाच्या भावनेनें काढले आहेत.

इंडोनेशियन स्वातंत्र्य मिळवून परत आल्यावर पंतप्रधान डॉ. हाटा यांनीं एका भाषणात ' जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून पं नेहरू करीत असलेल्या प्रयत्नास आम्ही साथ करूं ' अशी जाहीर घोषणा केली होती. यामुळें पददलित आशियावासी जनतेच्या उद्धारासाठीं भारत व इंडोनेशिया संयुक्त राष्ट्रसंघांत हातांत हात घालून प्रयत्न करताहेत व आशियांतील राष्ट्रांच्या पारतंत्र्याच्या बेड्या तटातट निखळून पडताहेत हें दृश्य दिसावयास फार वेळ वाट पहावयास नको.

भारतास इतका जिव्हाळा असणारें हें राष्ट्र नुकत्याच एका मोठ्या संकटांतून सहिसलामत बचावलें आहे. २७ डिसेंबरला डचांनीं दीडशें वर्षें गाजविलेली सार्वभौम सत्ता इंडोनेशियन पुढाऱ्यांच्या हातीं सोंपविली. त्या वेळीं जाकार्ता ( पूर्वीचें बटाव्हिया ) येथें दंगल होईल, सबंध इंडोनेशियांत या सत्तांतरास विरोध होईल, लढाया होतील, रक्ताच्या नद्या वाहतील अशीं भविष्यें वर्तविण्यांत आलीं होतीं. परंतु या संघराज्याच्या कार्यक्षम पुढाऱ्यांनीं इतका चोख बंदोबस्त ठेवला होता कीं, कोठेंहि कांहींहि घडलें नाहीं व मोठ्या उत्साहांत सर्व सोहाळा पार पडला. यानंतर

कांहीं दिवसांनीं पूर्वीच्या डच धेनेतील कॅप्टन वेस्टालिंग यानें 'दारूल इस्लाम' या धर्मवेडया मुसलमान स्वयंसेवक संघटनेच्या पाठिंब्यानें वीस हजारांची सेना उभारली व संघराज्याविरुद्ध लढाई सुरू केली. या वेळीं डच सरकार आपल्या आश्वासनास जागते कीं नाहीं याची शंका होती. परंतु डचांनीं आपल्या वचनास जागून वेस्टालिंगचा निषेध केला व डच सैनिकांनीं आपापल्या छावणींतच राहावें म्हणून हुकूम सोडले. या वेस्टालिंगनें कांहीं दिवस मोठी धामधूम उडवून दिली. मध्य जावांतील एका मोठ्या शहराचा कांहीं काळ ताबा मिळविला. परंतु संघराज्याच्या सेनेनें लागलींच त्या शहरावर हल्ला करून तें ताब्यांत घेतलें व वेस्टालिंगचा पुरा पाडाव केला शेवटीं वेस्टालिंगनें सिंगापूरला पलायन केलें. सध्यां हा बंडखोर डच अधिकारी ब्रिटिशांच्या कैदेंत आहे. वेस्टालिंगचा पाडाव झाल्यामुळें प्रजासत्ताकावरील मोठें संकट टळलें आहे. या संबंधांत पार्लमेंटचें उद्घाटन करतांना डॉ. सोकार्नो यांनीं काढलेले उद्गार पाहिले म्हणजे प्रजासत्ताकावरील केवढें मोठें संकट टळलें याची कल्पना येईल. ते म्हणाले,

"वेस्टालिंगच्या हालचालींना कमी लेखतां कामा नये. ज्यांना थोडीशी दूरदृष्टि आहे त्यांना सत्तांतराच्या वेळेपासून प्रतिगाम्यांनीं बंडाची योजना आंखली होती हें लक्षांत येईल. वाहतुकीची साधनें, लढाईचें अवजड साहित्य यांची वेस्टालिंगच्या सैन्याजवळ रेलचेल होती. ही गोष्टच त्यांतील योजनाबद्धता दाखविते. इंडोनेशियन संघराज्याच्या स्थापनेच्या वेळींच गडबड उडवून इंडोनेशिया स्वातंत्र्यास लायक नाहीं हें जगास दाखवायचा त्यामागे मोठा कट होता....वेस्टालिंगच्या संघटनेच्या शाखा आपल्या राज्यांत सर्वत्र स्थापन झालेल्या आहेत. व त्याला एका बाहेरच्या राष्ट्राचेंहि सहाय्य आहे. पकडण्यात आलेल्या त्याच्या सैनिकांजवळ सांपडलेल्या कांहीं कागदपत्रांवरूनही गोष्ट सिद्ध करतां येईल."

अशा एका मोठ्या संकटांतून इंडोनेशियन संघराज्य सहीसलामत व यशस्वी रीतीनें बाहेर पडलें आहे. प्रगतीच्या मार्गावरील एक मोठा अडथळा नाहींसा झाल्यामुळें या नव्या राज्याची आतां झपाट्यानें प्रगति होईल यांत शंका नाहीं. इंडोनेशिया हें लोकशाही संघराज्य राहाणार आहे. लोकशाही परंपरा भारताप्रमाणेंच या देशांत जुनी आहे. लोकशाहीस आवश्यक असलेला प्रबळ विरोधी पक्ष तेथें डॉ. शहरीर यांच्या नेतृत्वाखालीं तयार होत आहे. जनतेचें राहाणीचें मान वाढविणें व जनतेच्या कल्याणाच्या (वेल्फेयर) योजना आंखणें हें या संघराज्य सरकारचें धोरण असल्याचें अध्यक्ष डॉ. सोकार्नो यांनीं पहिल्या पार्लमेंटचें उद्घाटन करतांना जाहीर केलें. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतहि वाढतें सहकार्य नांदावें व सलोखा निर्माण व्हावा यासाठीं आपलें सरकार झटेल असें जाहीर आश्वासनहि त्यांनीं या भाषणांतून दिलें.

या पुस्तिकेंत आलेली बरीचशी माहिती इंडोनेशियन इन्फर्मेशन सर्विसतर्फे निघणाऱ्या 'मेर्डेका' या नियतकालिकांतून व त्याच संस्थेतर्फे काढण्यांत आलेल्या एका पुस्तकांतून घेण्यांत आली आहे. यासंबंधीं इंग्रजी नियतकालिकांतून वारंवार आलेल्या लेखांचाहि मला बराच उपयोग झाला आहे. इंडोनेशियाचा प्राचीन इतिहास, तेथील भारतीय संस्कृतीच्या वर्चस्वाचें व तेथील जनतेनें स्वातंत्र्यासाठीं दिलेल्या लढ्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करावयाची संधी व्यवस्थापक चित्रशाळा प्रकाशन यांच्यामुळेंच मला मिळूं शकली याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे. चित्रशाळेचे प्रमुख विश्वस्त श्री. त्र्यं. वि. उर्फ मामासाहेब देवगिरीकर यांनीं प्रथम मला या विषयाचा अभ्यास करावयास व ही लहानशी पुस्तिका लिहावयास स्फूर्ति व उत्तेजन दिलें याबद्दल त्यांचे आभार न मानणें हा कृतघ्नपणा होईल.

चंद्रकांत ताम्हाणे

# इंडोनेशियाची ओळख

९५° ते १४५° अक्षांश व ७° ते ११° रेखांशाच्या दरम्यान असलेल्या तीन हजार बेटांस 'इंडोनेशिया' म्हणतात. हिंदी महासागरापासून पॅसिफिक महासागरापर्यंतचा तीन हजार मैलांचा टापू या बेटांनीं व्यापला आहे. जावा, सुमात्रा, सेलेबस, मोल्युकाज, बोर्निओ व सुंडा हीं यांतील प्रमुख बेटें आहेत. या सर्व बेटांचें क्षेत्रफळ ७,५३००० चौरस मैल आहे. आशियाच्या मुख्य भूमीवरून ऑस्ट्रेलियांत जावयास इंडोनेशिया हा एक मधला थांबा आहे. आशिया खंडांत दिसून येणारीं सर्व वैशिष्ट्यें या बेटांत दिसून येतात. बाली बेटाच्या पूर्वेस मात्र ऑस्ट्रेलिया खंडाजवळ आपण जात आहोंत हें स्पष्ट दिसून येतें.

विषुववृत्त या बेटांच्या मधून जात असल्यामुळें या बेटांची हवा उष्ण असणार अशी कोणाचीहि कल्पना होईल. पण उंच उंच पर्वत, गर्द झाडी, समुद्राचें सान्निध्य यामुळें या बेटांची हवा बरीच समशीतोष्ण बनली आहे. या बेटांचें सरासरी उष्णतामान ५५° ते ९०° पर्यंतच असतें. समुद्राच्या निकट सान्निध्यामुळें या बेटांवर सपाटून पाऊस पडतो; व तो सतत वर्षभर असतो. बोर्निओ व सुमात्रा बेटांत तर पावसाचें प्रमाण १२०" ते १४४" असतें.

अंदमान–निकोबार बेटांपासून निघालेल्या पर्वतांची तुटक तुटक रांग जावा, सुमात्रा व इतर बेटांच्या मधून जाते. बोर्निओ, सेलेबस व मोल्युकाज या बेटांच्या मधून पर्वतांचे व टेकड्यांचे फांटे फुटलेले आहेत. सेलेबस व मोल्युकाजमध्यें या पर्वतांमुळें मोठमोठीं द्वीपकल्पें निर्माण झालीं आहेत. बोर्निओशिवाय बाकी सर्व बेटांत ज्वालामुखी आहेत. बहुतेक सर्व बेटांत

मध्यें पर्वत असल्यामुळें सर्वत्र नद्या आहेत; पण त्या इतक्या लहान आहेत कीं, नौकानयनासाठीं त्यांचा बिलकुल उपयोग होत नाहीं. जावा बेटांत मात्र नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठीं उपयोग करून घेण्यांत आला आहे. या नद्यांमुळें इंडोनेशियन भूमि सुपीक बनली आहे. वर्षभर पाऊस असल्यामुळें व जमीन सुपीक असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं एकापेक्षां जास्त पिकें येतात.

तांदूळ, मका व सागो हीं येथील प्रमुख पिकें आहेत. अन्नधान्याबाबत इंडोनेशिया स्वयंपूर्ण आहे, इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं धान्यें निर्यात करण्याइतकीं पिकतात. रबर, मिरची, लवंगा, जायफळ, वेत यांचें फार मोठें उत्पन्न या बेटांवर निघतें. सर्व बेटांवर नारळीचीं झाडें आहेत, व त्यांचेंहि फार मोठें उत्पन्न आहे. सर्व बेटांत जावा जास्त सुपीक आहे. इतर बेटांत पिकणाऱ्या धान्यांपेक्षां जावा बेटांत कडधान्यें, गळिताचीं धान्यें, कापूस, ऊंस, चहा, कोको, सिंकोना, टॅपिओका व मिरची हीं पिकें जास्त प्रमाणांत होतात. सुमात्रा बेटांत बहुतेक सारें जंगलच आहे. त्यांतच पेट्रोलच्या विहिरी, जस्त, कोळसा व सोनें यांच्या खाणी आहेत. बोर्निओ बेटावर सर्वांत मोठ्या पेट्रोलच्या विहिरी व कोळशाच्या अगणित खाणी आहेत. बोर्निओ बेटाच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें कोकोची मोठी लागवड करतात. सेलेबस बेटांतून तांदूळ, मका, कॉफी, खोबरें व मसाले यांची मोठी निर्यात होते. मोल्युकाज बेटें जायफळ, लवंगा व जायपत्री यांसाठीं प्रख्यात आहेत. याशिवाय मोल्युकाज बेटांवर तेलाच्या विहिरी व चांदीच्या खाणी आहेत. लहान बेटांवर कांहीं ठिकाणीं लोखंडाच्या खाणी आहेत. बऱ्याच ठिकाणीं समुद्रांतून मोतींहि काढतात.

१९३८ सालीं रबर, क्विनाइन, मिरची, तंबाखू यांत इंडोनेशियाचा नंबर जगांत पहिला होता. जस्त, खोबरें यांत दुसरा होता; चहा, कॉफी व तंबाखूच्या उत्पन्नांत तिसरा होता; व पेट्रोलच्या उत्पन्नांत चौथा होता. १९४० सालीं पेट्रोलच्या विहिरींतून ७९,३९००० टन पेट्रोल काढण्यांत आलें. इंडोनेशियाच्या निर्यातीपैकीं २९ टक्के खनिज द्रव्यें असतात.

रस्ते, रेल्वे, वीज यांबाबत सर्वांत जास्त सुधारणा जावांत झाली आहे. तेथें १७,००० मैल लांब पक्के रस्ते आहेत. सुमात्रा बेटांत जावाच्या मानानें कमी सुधारणा झाली आहे. इतर बेटांत मात्र रेल्वे जवळजवळ नाहींतच म्हटलें तरी चालेल. इंडोनेशियाचा समुद्रकिनारा आखातांनीं व सामुद्र-धुन्यांनीं भरलेला असल्यामुळें त्या देशांत अनेक चांगलीं बंदरें आहेत. बटाव्हिया, सॅमारंग, सूरबाया, बॅंडुइंग, जोगाकार्ता हीं जावा बेटावरील प्रमुख शहरें आहेत. पालेंबंग, पॅडंग व मेरन हीं सुमात्रांतील तीन प्रमुख बंदरें आहेत. सेलेबसमधील मकासार, बोर्निओंतील बंजरमासिन हीं थोडीं कमी महत्त्वाचीं शहरें आहेत.

१९३० सालच्या खानेसुमारींत या बेटांची लोकसंख्या ६०७,२७००० होती. १९४१ सालचा अंदाज ७२०,००००० चा होता. १९४५ सालचा अंदाज ७५०,००००० होता. त्यांपैकीं एकट्या जावा बेटांतच पांच कोटि लोक राहतात. याचा अर्थ सर्व बेटांच्या एक पंचमांश क्षेत्रफळ असलेल्या जावा बेटांत एकूण दोन-तृतीयांश लोकसंख्या आहे. १९३० सालच्या खानेसुमारीप्रमाणें दर चौरस मैलास इतर इंडोनेशियांत ७१ लोक तर जावांत ८०० लोक राहत. जावापेक्षां अडीच पट मोठ्या असलेल्या सुमात्रांत एक कोटि लोक राहतात. यामुळें जावांतून कांहीं लोकांचें सुमात्रांत स्थलांतर करण्याची योजना प्रजासत्ताकानें आंखली आहे. जावा बेटांत उद्योगधंदे नसल्यामुळें अत्यंत दरिद्री अवस्थेंत हे लोक राहतात.

इंडोनेशिया हा शेतीप्रधान देश आहे. ७० टक्के लोक शेती, मच्छी-मारी व शिकार यांवर जगतात. दोन वेळां भात व मासळीचें कालवण हेंच या लोकांचें अन्न. इतर तीस टक्के लोक मोठमोठ्या मळ्यांत, खाणींत, तेलाच्या विहिरींत व उद्योगधंद्यांत मजुरी करून राहतात.

या बेटांवरील बहुसंख्य लोक मुसलमान आहेत. त्यांची विशिष्ट अशी संस्कृति आहे. मात्र प्राचीन काळच्या हिंदु संस्कृतीचे अवशेष अद्यापहि

पहावयास मिळतात. बाली बेटांत तर जवळजवळ २५ लाख लोक हिंदु आहेत. तेथें रामायण व महाभारताचें नियमित वाचन होतें. श्री. राघवन् हे हिंदचे प्रतिनिधि म्हणून असतांना एका खेडयांत मुसलमानांनीं शुक्रवारीं बुद्धाच्या मूर्तीवर फुलें वाहिलीं असल्याचें त्यांनीं पाहिलें ! बाली बेटांतील एका राजाजवळ पर्ण-पत्रिकांवर लिहिलेलीं पुराण-ग्रंथांचीं हस्तलिखितें आहेत हें त्यांनीं पाहिलें.

हिंदुस्थानबद्दल बाली बेटांतील लोकांस काय वाटतें हें पुढील गोष्टीवरून कळून येईल. बाली बेटावरील एका युद्धांत महाभारताच्या अठरा पर्वांपैकीं सात पर्वें हरवलीं. शांतता प्रस्थापित झाल्यावर चिनी लोकांनीं हे सात पर्वें आणून देतों असें सांगितलें. परंतु प्रत्यक्ष हिंदुस्थानांतून न आलेले कोणतेच खंड घ्यावयास तेथील लोक तयार नव्हते. यामुळें बाली बेटांतील महाभारत अकरा पर्वांचेंच आहे. श्री. राघवन् यांना पाहतांच बाली बेटांतील एका राजाच्या डोळ्यांत तर आनंदाश्रु आले.

# स्वातंत्र्यांतून पारतंत्र्याकडे

## प्राचीन इतिहास

श्यामवर्णी मलायी लोक राहत असलेल्या या देशास प्राचीन काळीं मलायाशिया म्हणत. बॅस्टियन नांवाच्या एका जर्मन संशोधकानें वंश-शास्त्राचा अभ्यास करून या प्रदेशास इंडोनेशिया असें नांव दिलें. मात्र त्या काळीं फोर्मोसा, ब्रिटिश मलाया, डच ईस्ट इंडीज व फिलिपाईन्स एवढ्या विस्तीर्ण प्रदेशास इंडोनेशिया म्हणत. कालांतरानें डच ईस्ट इंडीजशिवाय प्रत्येक प्रदेश वेगवेगळ्या नांवानें ओळखला जाऊं लागला. यामुळें डचांच्या अमलाखालील प्रदेशांतील लोक आपल्याच भागास इंडोनेशिया म्हणूं लागले.

पॅसिफिक महासागरांतील निसर्गसौंदर्याने नटलेल्या या बेटांवरील वसाहत बरीच जुनी आहे. ५००० वर्षांपूर्वी चीनच्या युनान प्रांतांतून आलेल्या लोकांनी या बेटांवर पहिली वसाहत केली. समुद्रमार्गे हे लोक या बेटांवर आल्यामुळें ते किनाऱ्याकिनाऱ्यानें राहत व मच्छीमारीवर स्वतःची उपजीविका करीत. लहान लहान होड्यांतून आजूबाजूच्या प्रदेशांशीं त्यांचें दळणवळण चाले. कालांतरानें ते अंतर्गत प्रदेशांत गेले व शेती करावयास शिकले.

या लोकांनीं स्वतःची अशी एक विशिष्ट संस्कृति निर्माण केली होती. दगडांच्या हत्यारानें ते शिकार करीत. त्यांना सुतारकाम चांगलें येत असे. विशेषतः लांकडावर नक्षी खोदण्यांत ते तरबेज होते. नक्षीकाम केलेल्या लांकडांचीं आकर्षक घरें बांधून त्यांत ते राहत. मातीचीं भांडीं बनविण्यांत ते वस्ताद होते. कापड विणण्याची कला त्यांना अवगत होती. पाटबंधाऱ्यांवर शेती करून ते तांदूळ पिकवीत.

यांच्यानंतर २५०० वर्षांनीं दुसरे वसाहतवाले आले. पूर्वीच्या युनानी टोळ्यांपेक्षां ते जास्त सुधारलेले होते. त्यांना धातूचा उपयोग माहीत होता. ते लोखंडाचीं हत्यारें वापरीत. या हत्यारांचा उपयोग करून त्यांनीं पूर्वीच्या वसाहतवाल्यांचा पराभव केला, व त्यांची डोंगराळ भागांत हकालपट्टी केली. मात्र कालांतरानें त्यांच्यांतील संघर्ष कमी होऊन या दोन संस्कृतींतून एक अगदीं वेगळी संस्कृति उदयास आली. हिंदुस्थानांतून हिंदु व बौद्ध येण्यापूर्वीं येथें ही संस्कृति नांदत होती.

इसवी सनापूर्वी पहिल्या शतकापासून हिंदु वसाहतवाले या प्रदेशांत उतरूं लागले. एका शतकाच्या अवधींत त्यांनीं तेथील आदिवासींत हिंदु धर्म व हिंदु संस्कृति यांचा फैलाव करण्यांत यश मिळविलें. याच कालांत हिंदु वसाहतवाल्यांच्या नेतृत्वाखालीं सर्व बेटांवर हिंदु राज्यें अस्तित्वांत आलीं. रामायण–महाभारतादि हिंदूंचीं महाकाव्यें येथील जनतेनें इतकीं

आत्मसात केली कीं अद्यापपर्यंत रामायण–महाभारतांतील वीर जावांतच झाले असे ते मानतात ! याच कालांत हिंदु शिल्पकलेचा विकास झाला, व हिंदु देवतांचीं प्रचंड मंदिरें बांधण्यांत आलीं. प्राचीन काळच्या या भव्य मंदिरांचे भग्न अवशेष जावांत आजहि पहावयास सांपडतात.

हिंदूंच्या मागोमाग इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत धर्मप्रसारासाठीं बौद्ध भिक्षु या बेटावर उतरले. पांचव्या व सहाव्या शतकापर्यंत या बेटांवरील सर्व लोक बुद्धधर्मीय बनले. प्राचीन इंडोनेशियन संस्कृति व नवोदित हिंदु व बौद्ध संस्कृति यांच्या संगमांतून श्रीविजय साम्राज्याच्या नेतृत्वाखालीं एक नवी संस्कृति निर्माण झाली.

## प्राचीन साम्राज्यें

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत सुमात्रा बेटांवरील श्रीविजय या रम्य नगरींत एका राज्याची स्थापना झाली. अवघ्या दोन शतकांत बोर्निओ, सेलेबस, जावा, फिलिपाइन्स इतक्या दूरवरच्या प्रदेशावर या राज्याची अधिसत्ता प्रस्थापित झाली. कांहीं काळ तर चीनचा कँटनजवळील भाग व हिंदुस्थानचा दक्षिण कोपरा या भागावरहि श्रीविजयची सत्ता होती.

जहाजें बांधणें हा श्रीविजयच्या जनतेचा प्रमुख धंदा होता. अतिशय प्रबळ आरमाराच्या जोरावर श्रीविजयनें आपल्या साम्राज्याची उभारणी केली होती. यामुळें पॅसिफिकमधील सर्व व्यापाराची मक्तेदारी श्रीविजयच्या प्रजेकडे होती. दुसऱ्या शतकांत स्थापन झालेलें हें साम्राज्य दुसरी प्रबळ आरमारी सत्ता निर्माण होईपर्यंत म्हणजे चौदाव्या शतकापर्यंत टिकलें.

हिंदुस्थानच्या दक्षिण कोपऱ्यापासून कँटनपर्यंत पसरलेल्या अवाढव्य प्रदेशावर सत्ता गाजविणाऱ्या श्रीविजय राज्याला जावाच्या पूर्व किनाऱ्यावरील मयोपहित या छोटया हिंदु राज्याचा पाडाव करतां आला नव्हता. श्रीविजयप्रमाणेंच या छोटया राज्याचें अस्तित्वहि व्यापारावरच अवलंबून

होतें. त्यामुळें या दोन्ही राज्यांत नेहमीं व्यापारी चुरस असे. नवव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत श्रीविजयच्या सेनेनें हें राज्य जिंकण्याची पराकाष्ठा केली. पण या राज्यानें आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकविलें, एवढेंच नव्हे तर या युद्धकाळांतहि भव्य देवळें बांधलीं. बोरोबुदूरचें अतिप्रचंड देवालयहि याच काळांत बांधलें गेलें.

बाराव्या शतकापासून मयोपहित राज्यानें श्रीविजयवर आक्रमणें करावयास सुरुवात केली. शेवटीं १३७७ मध्यें श्रीविजयचा शेवटचा पराभव झाला. मयोपहित राज्याचें हें आक्रमण साम्राज्यशाही स्वरूपाचें होतें. साम्राज्यवाढीच्या या कालांत सुहिता नांवाची शूर राणी मयोपहितवर राज्य करीत होती.

मयोपहितची राज्यव्यवस्था अत्यंत कार्यक्षम होती. सर्व सत्ता मध्यवर्ती असून जकाती व कर वसूल करणारीं खातीं त्या काळच्या मानानें फारच सुधारलेलीं होतीं. आजकालच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील खाते-विभागणीप्रमाणें मयोपहितची खाते-विभागणी होती. वसाहत खातें, व्यापार खातें, सार्वजनिक आरोग्य खातें, अंतर्गत व्यवस्था खातें हीं विविध खातींच या विधानाची सत्यता पटवितात. दोन न्यायाधीश व सात दुय्यम न्यायाधीश असलेलें एक सर्वोच्च न्यायालयहि तेथें होतें.

मयोपहित हें व्यापारी राज्य होतें. आपल्या वसाहती व हिंदुस्थान, चीन वगैरे देशांशीं त्याचा मोठा व्यापार चाले. मयोपहितची राजधानी एका व्यापारी व भरभराटलेल्या शहरीं होती. या शहराच्या मध्यभागीं श्रीशंकराचें एक भव्य देवालय होतें. याशिवाय जावामध्यें अनेक मोठमोठीं बंदरें होतीं. सबंध राज्यांत निवळ दगडाचीं ५०० पेक्षां जास्त देवळें होतीं. हीं देवळें बांधण्यासाठीं हिंदुस्थानांतून उत्कृष्ट कलावंत आणण्यांत आले होते.

मात्र हें साम्राज्य फार काळ टिकलें नाहीं. चौदाव्या शतकांत निरनिराळ्या वसाहतींनीं स्वातंत्र्य पुकारावयास सुरुवात केली. त्यांतच चीनशी भांडण जुंपल्यामुळें एक मोठें चिनी आरमार जावावर चालून आलें. १४२६ मध्यें पडलेल्या भयंकर दुष्काळानें तर या साम्राज्याच्या मुळावरच घाव घातला. त्यानंतर अनेक आवर्तांनीं खिळखिळें झालेलें हें साम्राज्य ५० वर्षांनीं मलाक्काच्या मुसलमान सुलतानानें जिंकून घेतलें.

## मुसलमानी धर्माचा प्रसार

प्राचीन काळापासून आरबांचा इंडोनेशियाशीं व्यापार चालत असे. याच आरब व्यापाऱ्यांनीं इंडोनेशियांत मुसलमानी धर्माचा प्रसार केला. प्रथम अचेह येथील कांहीं इंडोनेशियनांनीं मुसलमान धर्माचा स्वीकार केला. यामुळें इंडोनेशियांतील पहिलें मुसलमान राज्य १२०५ सालीं जोहनशहाच्या नेतृत्वाखालीं सुमात्रा बेटावरील अचेहच्या आजूबाजूच्या भागावर स्थापन झालें.

आरब व्यापाऱ्यांबरोबर हिंदी मुसलमानांनींहि या धर्मप्रसारांत भाग घेतला. हे धर्मप्रसारक व्यापाराच्या मिषानें आल्यामुळें प्रथम किनारांतर्गत प्रदेशांतच मुसलमान धर्म फोफावला. १२९२ सालीं येथें आलेल्या मार्कोपोलोनें या भागांत मुसलमानांचीं बरींच शहरें असल्याची माहिती लिहून ठेवली आहे. १४१३ सालीं प्रवास करणाऱ्या एका चिनी प्रवाशानें आरू या अंतर्गत भागांतील राजा व प्रजा मुसलमान असल्याचें लिहिलें आहे.

सुमात्रा बेटांत धर्मप्रसाराचें हें कार्य पंधराव्या शतकापर्यंत चाललें होतें. बाराव्या शतकाच्या अखेरीस जावा बेटाच्या पश्चिम भागांतील पजाजरन हा राजपुत्र मुसलमान होऊन हिंदुस्थानांतून परतला. जावा बेटांत मुसलमान धर्माचा प्रसार करण्याचें बरेंच श्रेय याला व मौलाना मलिक इब्राहिम या आरब व्यापाऱ्याला आहे. जावा व सुमात्रांतील मुसलमान धर्मप्रसारकांनीं

पंधराव्या शतकांत आपलें लक्ष मोल्युकाज बेटांकडे वळविलें. या बेटांतील दोन राजांनींच मुसलमान धर्म स्वीकारल्यामुळें धर्मप्रसाराचें काम सोपें झालें. बोर्निओ व सेलेबसमध्ये मुसलमान धर्माचा प्रसार सर्वांत शेवटीं झाला. अशा रीतीनें सतराव्या शतकापर्यंत इंडोनेशियांतील ९० टक्के प्रजा मुसलमान झाली. बाकीच्या १० टक्क्यांत हिंदु व ख्रिश्चन आहेत.

## मुसलमानी राज्यांची स्थापना

जावा व सुमात्रा बेटांवर मुसलमानांची संख्या जसजशी वाढूं लागली, तसतशीं कांहीं मुसलमान राज्येंहि अस्तित्वांत येऊं लागलीं. १२०५ सालीं सुमात्रांतलि अचेह येथें जोहनशहाच्या नेतृत्वाखालीं पहिलें मुसलमानी राज्य स्थापन झालें. १५११ च्या सुमारास जावाच्या पूर्व भागांत तीन मुसलमान राज्यें स्थापन झालीं. त्यांत डेमकची सलतनत सर्वांत मोठी होती. कालांतरानें पूर्व जावा व दक्षिण सुमात्राचा पालेंबंग भाग या भागावरहि डेमकची अधिसत्ता स्थापन झाली.

१५२२ च्या सुमारास बांटम येथें एक मुसलमानी राज्य स्थापन झालें. सध्यांचा बटाव्हिया भाग असलेला सुंडा कलापा हा जावाच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश बांटमच्या सुलतानानें जिंकून घेतला. यामुळें बांटम ही जावाच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक प्रबळ सत्ता झाली. अबदुल फत्ते अगूंग ( १६६१ ते १६८५ ) हा बांटमच्या सुलतानांपैकीं सर्वांत महत्त्वाकांक्षी होता. बांटम हें मिरच्यांच्या व्यापाराचें मोठें केंद्र होतें. सतराव्या शतकापर्यंत बांटमचा हा व्यापार मोठा भरभराटलेला होता.

सुमात्रा बेटावर अचेहची सलतनत ही सर्वांत जुनी व मोठी होती. पंधराव्या शतकाच्या मध्यास मिनांगकबाऊ या राज्याचा अचेहच्या सुलतानानें ताबा मिळविला. सुमात्राच्या आग्नेय किनाऱ्यावरील डेली व इंद्रगिरी व मलायाच्या सामुद्रधुनींतील केडा व पहांग या राज्यांनीं अचेहच्या

सुलतानाचें मांडलिकत्व पत्करलें. १६१३ मध्यें अचेहच्या सैन्यानें जोहोरवर स्वारी करून तें राज्य जिंकून घेतलें. १६०७ पासून १६३६ पर्यंत इस्कंदर मूडा हा अचेहचा सुलतान होता. या काळांत त्यानें मलायाच्या सामुद्रधुनींतील नैर्ऋत्य भागावर पुरें स्वामित्व मिळविलें होतें. यामुळें सुमात्राचा सर्व मिरच्यांचा व्यापार आणि केडा, बंका व बिलिटन येथिल जस्ताच्या खाणी यांवर अचेहच्या सुलतानाची मालकी आली.

जावा व सुमात्रा या बेटांवरील मोठमोटया मुसलमानी राज्यांशिवाय मोल्युकाजचा समुद्रकिनारा व आजुबाजूंचीं बेटें यांवर सत्ता गाजविणारीं टर्नेट व टिडोर हीं दोन लहान राज्यें होतीं. सुलतान बाबुल्ला याचें राज्य असतां टर्नेटच्या अधिराज्याखालीं ७२ बेटें होतीं.

या बेटांवरील सर्वांत प्रबळ मुसलमानी राज्य जें डेमकची सल्तनत तिचे कालांतरानें चार भाग पडले. मध्य जावांतलि पाजंग हें त्यांतील एक राज्य होतें. सोळाव्या शतकाच्या मध्यास पाजंगच्या सुलतानानें मतारम हा सुपीक जिल्हा आपल्या एका सरदारास दिला. या मुसलमान सरदाराचा सुताविजय हा मुलगा इतिहासांत सेनापति या नांवानें प्रख्यात आहे. यानें जावाच्या पूर्व किनाऱ्यावरील चेरीबॉन ते बालेंबंगपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. हा सेनापति १६०१ सालीं मरण पावला. त्या वेळीं सूरबाया व ग्रिसिक हे समुद्रकिनाऱ्याचे दोन जिल्हे सोडून सबंध जावा बेट त्याच्या सत्तेखालीं होतें.

सेनापतिनंतर झालेल्या राजांत सुलतान अगूंग हा मोठा प्रबळ राजा होता. आपल्या पूर्वजांपेक्षां तो कट्टर मुसलमान होता. आपल्या राज्यांत त्यानें कुराणावर आधारलेले कायदे जारी केले; सर्वांस सारखा कर बसेल अशी नवी करपद्धति अमलांत आणली. यांत भातशेताच्या प्रमुखांवरील कर व व्यापाऱ्यांवरील विक्रीकर येत असे. त्यानें जावा बेटास प्राचीन मयोपाहित साम्राज्याच्या वेळचें वैभव आणून दिलें.

२०७९ का. वा. २१८ ३११

बंडा बेटांवर पोर्तुगीज उतरले त्या वेळीं तेथें अनेक लोकराज्यें होतीं. हे लोक मोठे उद्योगी असून जावा व मोल्युकाजमधील बराच मोठा व्यापार त्यांच्या हातीं होता. याशिवाय युरोपियनांच्या आगमनाचे वेळीं सेलेबस बेटांवर मकासारची सलतनत असून तें एक कडवें मुसलमान राष्ट्र होतें.

## युरोपियनांचीं आक्रमणें

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस इंडोनेशियांतील व्यापारामुळें आकर्षित झालेल्या पोर्तुगीज लोकांच्या टोळधाडी या बेटांवर उतरल्या. पोर्तुगिजांच्या मागून युरोप खंडांतील विविध देशचे लोक येथें आले. प्रथम १५२१ मध्यें स्पॅनिश आले, १५३० मध्यें फ्रेंच आले, १५९२ मध्यें डच आले व सर्वांत शेवटीं १६०२ मध्यें इंग्रज आले. इतर पौर्वात्यांप्रमाणें व्यापाराच्या मिषानें आलेल्या या अभ्यागतांचें इंडोनेशियन जनतेनें स्वागत केलें. परंतु या लोकांनीं तेथील धार्मिक व राजकीय बाबतींत लुडबुड केलेली त्यांस सहन झाली नाहीं व आपल्या स्वातंत्र्यासाठीं इंडोनेशियनांनीं या परकीयांशीं मोठमोठीं युद्धें केलीं.

इंडोनेशियन मुसलमान हे मूर लोक आहेत अशी पोर्तुगिजांची त्या काळीं कल्पना होती. मूर लोक व पोर्तुगीज यांचें हाडवैर जगप्रसिद्धच आहे. या मुसलमानांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देण्याचा पोर्तुगीजांनीं प्रयत्न केला. यामुळें डेमकच्या सुलतानानें चिडून पोर्तुगिजांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारलें व पोर्तुगीजांविरुद्ध लढणाऱ्या मलाक्काच्या सुलतानाच्या मदतीसाठीं मोठें आरमार पाठविलें. अचेहच्या सुलतानानेंहि धर्मयुद्धांत भाग घेतला. सुलतान हरूण या टर्नेटच्या सुलतानानें मोल्युकाजमधून पोर्तुगिजांची हकालपट्टी केली. मुसलमान व्यापाऱ्यांनीं पोर्तुगीज व्यापाऱ्यांवर बहिष्कार टाकला. इंडोनेशियनांच्या या लोकयुद्धामुळें या बेटांवरून पोर्तुगिजांची हकालपट्टी झाली.

पोर्तुगीजांच्या धर्मप्रसारक धोरणामुळें त्यांचा पराभव झालेला पाहून इतर युरोपियन लोक सावध झाले. इंडोनेशियनांशीं केवळ व्यापारी संबंधच ठेवल्यामुळें डचांना बऱ्याच व्यापारी सवलती मिळाल्या. यांत इंडोनेशियनांचा आणखी एक फायदा होता. पोर्तुगिजांबरोबर चाललेल्या धर्मयुद्धांत आपल्याला डचांचें साहाय्य मिळेल अशी इंडोनेशियनांना आशा होती.

अचेह व मदुरा बेटांवर मात्र डचांना बिलकुल थारा मिळाला नाहीं. १५९९ सालीं डचांच्या पहिल्या व्यापारी काफिल्याचा अचेहच्या आरमारानें धुव्वा उडविला. अचेह ही एक प्रबळ सत्ता असल्यामुळें सुमात्रा बेटावर डचांचें कांहीं चाललें नाहीं. १६४० च्या सुमारास अचेहची सत्ता थोडी दुबळी झाल्यावर सुमात्रांतील बंदरांशीं व्यापार करणें डचांना शक्य झालें.

## साम्राज्यासाठीं डचांची धडपड

कालांतरानें डचांचाहि अंतस्थ हेतु उघड झाला. सर्व इंडोनेशियन बेटांवर आपलें साम्राज्य स्थापण्याची त्यांची इच्छा व सर्व व्यापारावर ताबा मिळविण्याची हांव यामुळें त्यांना इंडोनेशियन, पोर्तुगीज, फ्रेंच, स्पॅनिश व इंग्लिश यांच्याशीं शत्रुत्व पत्करावें लागलें. १६०२ मध्यें बंडानीज लोकांशीं डचांचें ज्या वेळीं युद्ध जुंपलें त्या वेळीं इतर युरोपियनांनीं बंडानिज जनतेस सर्वतोपरी साहाय्य केलें. या लढाईत डचांनीं ब्रिटिश आरमाराचा पुरा धुव्वा उडविला. हें युद्ध बरींच वर्षे चाललें होतें. शेवटीं डचांच्या जे. पीटरसन कोएन या सेनापतीनें सर्व बंडा बेट आपल्या ताब्यांत घेतलें.

१६१८ सालीं या कोएनलाच डचांनीं इंडोनेशियांतील आपल्या प्रदेशाचा गव्हर्नर नेमलें. त्या वेळीं डचांची सर्व पत खलास झाली होती.

मतारमच्या सेनेनें जापारा येथील डच व्यापारी केंद्राचा धुव्वा उडविला होता. जापारानंतर मतारमच्या सेनेनें जाकार्तावर हल्ला केला. परंतु १६१९ मध्यें कोएननें मतारमच्या सेनेचा पराभव केला व जाकार्ताचें नांव बदलून बटाव्हिया ठेवलें. मतारमच्या सेनेनें जाकार्ता परत घेण्याचा खूप प्रयत्न केला, पण डचांच्या शिस्तबद्ध सैन्याविरुद्ध त्याचें कांहीं चाललें नाहीं.

मोल्युकाजमधील जनतेनेंहि डचांविरुद्ध बरेच उठाव केले. या मुसलमानांविरुद्ध लढण्यासाठीं लोक हवेत म्हणून डचांनीं मोल्युकाजमधील रानटी लोकांस खिश्चन धर्माची दीक्षा दिली. यामुळें मुसलमान लोकांचीं माथीं भडकून गेलीं. मकासारच्या सुलतानानें या जनतेच्या मदतीसाठीं मोठी सेना पाठविली. यामुळें बटाव्हियाचें डच सरकार व मकासारचा सुलतान यांत वैर उत्पन्न होऊन त्याचें पर्यवसान दोन मोठीं युद्धें होण्यांत झालें.

शेवटीं १६६० मध्यें झालेल्या निकराच्या लढाईत मकासारचा पराभव झाला. पण तेथील धर्मनिष्ठ लोकांनीं मदुरा व बांटम बेटांवर पळून जाऊन डचांशीं लढण्यासाठीं बलवान् संघटना उभारली. या वेळीं बांटमवर अबदुल फत्ते अगूंग हा महापराक्रमी राजा राज्य करीत होता. या सुलतानानें ब्रिटिश व फ्रेंच यांना आश्रय देऊन डचांशीं युद्ध सुरू केलें. याच्या आरमारानें सुमात्रांतील डच बंदरांवर हल्ले करावयासहि कमी केलें नाहीं. याच सुमारास मकासारच्या जनतेनेंहि फिरून उचल खाल्ली. सन १६७८ सालीं बटाव्हियाच्या सरकारनें अँथनी हर्ड याची या सेनेविरुद्ध रवानगी केली. त्यानें बांटमचा पाडाव करून अबदुल फत्ते अगूंग या राजास कैद केलें व मकासारचा पराभव केला.

## डचांविरुद्ध धर्मयुद्ध

बांटम व मतारम या दोन प्रबल मुसलमान राज्यांचा डचांनीं पराभव केल्यामुळें सर्व इंडोनेशियांतील मुसलमान समाज खवळला व त्यानें डचा-

विरुद्ध धर्मयुद्ध सुरू केलें. सुमात्रांतील मिनांग कबूच्या डच व्यापारी केंद्रावर हल्ले करावयास सुरुवात केली. मदुरांतील लोकांनीं बंडें केलीं; जाकार्तनच्या जंगलांत दडून बसलेल्या हजारों देशभक्तांनीं सूरापतीच्या नेतृत्वाखालीं डचांशीं युद्ध सुरू केलें. मतारमच्या सुलतानाच्या पराभवानंतर तेथील जनतेनें गुप्त रीतीनें लढाईची तयारी चालविली.

१७४० मध्यें डचांनीं मतारमच्या जनतेचें बंड मोडून काढलें. १७५५ सालीं बोर्निओ बेटांतील लोकांचा डचांनीं पराभव केला व सबंध बोर्निओवर आपलें अधिराज्य प्रस्थापित केलें. बाली बेटांतील जनतेनें मात्र १७७४ पर्यंत डचांना स्वस्थता लाभूं दिली नाहीं. १८०८ सालीं बांटम व १८११ सालीं पालेंबंगच्या जनतेनें बंडें केलीं, पण तीं अयशस्वी ठरलीं.

१८२५ पासून १८३० पर्यंत जावांतील लोकांनीं दिपोंगोरोच्या नेतृत्वाखालीं बंड केलें. डचांशीं लष्करी सामना देण्यासाठीं त्यानें कित्येक वर्षें गुप्त रीतीनें युद्धाची तयारी केली. जावांतील जनतेवर डचांनीं चालविलेल्या अत्याचारामुळें जनतेंतील असंतोष वाढला होता. दिपोंगोरोनें गनिमी काव्यानें युद्ध करावयास सुरुवात केली. हें युद्ध पांच वर्षें चाललें होतें. शेवटीं डचांनीं दिपोंगोरोचें १५,००० सैन्य मारलें व त्याला पकडून सेलेबस बेटांवर हद्दपार केलें.

याच सुमारास टेंकू उमर बोंडपोल यानें बंडाचा झेंडा उभारला. हा सुधारणावादी असल्यामुळें याला बरेच शत्रु होते. कित्येक ठिकाणीं त्यानें डचांचा पराभव केला. पण दिपोंगोरोचें बंड शमल्यानंतर डचांनीं आपली सर्व शक्ति त्याच्याविरुद्ध केंद्रित केली व १८३७ सालीं त्याचा पराभव केला. त्यालाहि सेलेबसला हद्दपार करण्यांत आलें. तेथें तो १८५४ सालीं मरण पावला.

## अखेरची शरणागति

इंडोनेशियन राजांविरुद्ध सबंध १९ वें शतक डचांना युद्ध करावें लागलें. जसजसा डचांचा वरचष्मा दिसूं लागला तसतशी या द्वीपसमूहा-

वरील राजांनीं डचांच्या अधिसत्तेपुढें मान तुकविली. सुमात्राच्या उत्तर कोपऱ्यांतील अचेहच्या सुलतानानें मात्र ती मानली नाहीं. १८७३ सालीं अचेह व डच यांत युद्ध सुरू झालें. १८७४ सालीं डचांनीं कोतारजा ही अचेहची राजधानी ताब्यांत घेतली. सुलतान अल्लाउद्दिनशहा याच वेळीं मरण पावला व त्याच्या सेनापतीस जेडा येथें हद्दपार करण्यांत आलें. १८७९ सालीं डचांनीं या राज्याचा बराच मुलूख आपल्या सत्तेखालीं आणला. पण पांगलीमा पोलिम व टेंकू उमर यांच्या नेतृत्वाखालीं इतर विभागांनीं युद्ध चालू ठेवलें. या युद्धांत डचांचा बराच पैसा खर्च झाल्या मुळें डचांनीं आपलें धोरण बदलावयाचें ठरविलें

या उलट इंडोनेशियनांनीं मोठ्या प्रमाणावर आपल्या सेनेची जमवाजमव करावयास सुरुवात केली. डचांनीं नाना उपाय करून पाहिले पण त्यांना या सेनेचा पराभव करतां येईना. शेवटीं १८९२ मध्यें शांततेच्या वाटाघाटी करावयास डचांनीं सुरुवात केली. टेंकू उमरनेंहि डचांशीं सहकार्य करावयाचें ठरविलें. डचांचा त्याच्यावर इतका विश्वास बसला कीं त्याला सर्व सेनेचा सरसेनापति करण्यांत आलें. मात्र २९ मार्च १८९६ सालीं या टेंकू उमरनें बंड केलें. त्याचे सर्व सहकारी त्याच्याभोंवतीं गोळा झाले व त्यांनीं डचांशीं निकराचा लढा द्यावयास सुरुवात केली. यानंतर सुरू झालेल्या लढाईंत ११ फेब्रुवारी १८९९ सालीं तो लढाईंत मारला गेला. त्याच्या मृत्यूनें इंडोनेशियनांचा स्वातंत्र्य-लढा संपुष्टांत आला.

मात्र अचेहच्या जनतेनें आपला लढा पुढें चालू ठेवला. सुलतान टेंकू महंमद दाऊद याचा डचांनीं पाठलाग सुरू केला. १९०२ सालीं त्याच्या बायकोस अटक करण्यांत आली व १९०३ सालीं त्याला पकडून हद्दपार करण्यांत आलें. त्यानंतर १९१३ पर्यंत किरकोळ चकमकी चालू होत्या. जपान्यांनीं या प्रदेशाचा ताबा घेईपर्यंत तेथें लष्करी गव्हर्नरचें राज्य होतें.

# पारतंत्र्यांतील पिळवणूक

## डचांची वसाहत-सत्ता

डचांच्या वसाहत-विषयक धोरणाचा अभ्यास करावयाचा तर डच ईस्ट इंडीज कंपनीपासूनचा आढावा घेतला पाहिजे. सन १५१५ पासून डचांनीं इंडोनेशियनांशीं व्यापार करावयास सुरुवात केली. १६०२ सालीं डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. या कंपनीस डच सरकारनें इंडो-नेशियांत व्यापार करावयाची मक्तेदारी दिली. या कंपनीनें इतका गडगंज नफा मिळवला कीं सतत दोन शतकें ही कंपनी आपल्या भागीदारांस दर साल १२॥ ते ५० टक्केपर्यंत डिव्हिडंड देत असे.

सुरुवातीस जाकार्ता येथेंच डचांची वखार होती. कालांतरानें त्यांनीं आणखी व्यापारी केंद्रांवर ताबा मिळविला. १६०९ सालीं डच वखारींची व्यवस्था लावण्यासाठीं गव्हर्नरची जागा निर्माण करण्यांत आली. थोडयाच अवधींत वखारींची जागा वसाहतींनीं घेतली. या वसाहती जावा बेटाच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें असत. कंपनीची अधिसत्ता छोट्या राजांवर चाले व ते धान्याच्या रूपानें कंपनीस खंडणी देत. सतराव्या शतकाच्या अखेरीस पोर्तुगीज व स्पॅनियर्ड लोकांची हकालपट्टी झाल्यावर डचांनीं कांहीं इंडो-नेशियन बेटें आपल्या प्रत्यक्ष हुकमतीखालीं घेतलीं. या काळांत आपला वरचष्मा सुरक्षित राहवा म्हणून डचांनीं इंडोनेशियनांच्या ताब्यांत असलेली वाहतुक आपल्या ताब्यांत घेतली.

कंपनीच्या ताब्यांत असलेली जमीन करण्यासाठीं सक्तीचे मजूर लावण्यांत येत. कंपनीनें इंडोनेशियन जनतेवर व राजांवर आपली सार्वभौम सत्ता लादल्यामुळें त्यांना सक्तीनें मजूर मिळवितां येत. कंपनीच्या कामावर यावयाचें एकाद्यानें नाकारल्यास अमेरिकेंत नीग्रो गुलामांना जशी शिक्षा होई तशीच

शिक्षा होत असे. अशा प्रकारें मिळविलेल्या जमिनीवर कंपनीनें मसाल्याचें उत्पन्न काढावयास सुरुवात केली. याच वेळीं मसाल्याचें उत्पन्न काढण्यास इंडोनेशियनांना बंदी करण्यांत आली. डचांच्या या धोरणामुळें इंडोनेशियन व्यापारी वर्ग बेकार झाला. मात्र कंपनीच्या या पिळणुकी धोरणामुळें इंडो-नेशियन जनता असंतुष्ट झाली व तिनें या पद्धतीविरुद्ध वारंवार लढे दिले. यामुळें कंपनीचें उत्पन्न घटत जाऊन १७९८ सालीं कंपनी बंद करण्यांत आली व तिची सर्व मालमत्ता बटाव्हियन ( डच ) रिपब्लिककडे देण्यांत आली. १८०७ सालीं नेमलेल्या चौकशी समितीनें व्यापारी मक्तेदारी, सरंजामशाही व्यवस्था व सक्तीची मजुरी चालू ठेवण्यांत यावी अशी शिफारस केली.

१८११ सालीं नेपोलियननें हॉलंडचा ताबा घेतला. त्या वेळीं इंडो नेशियाचा सर्व कारभार ब्रिटिशांकडे आला. इंडोनेशियांत कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठीं हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयनें स्टॅम्फोर्ड रॅफल्स याची रवानगी केली. त्यानें इंडोनेशियांतील पोलिस, न्यायखातें वगैरे खात्यांत बरीच सुधारणा केली. प्रत्येक गांवावर त्यानें वार्षिक उत्पन्नाच्या दोन–पंचमांश कर लादला. १८१४ मध्यें झालेल्या तहानुसार ब्रिटिशांनीं इंडोनेशिया डचांच्या स्वाधीन केला.

## नवें धोरण

१८१८ सालीं इंडोनेशियांतील डच सरकारची पुनर्घटना करण्यांत आली. लहानसहान व्यवसाय करावयास व जमिनी कसावयास इंडोनेशियनांस प्रोत्साहन देण्याचें ठरलें. सरकारी निर्यातीची सर्व व्यवस्था पाहण्यासाठीं नेदरलंडस् ट्रेडिंग कंपनी स्थापन करण्यांत आली. ही कंपनी स्थापन करण्यांत खुद्द हॉलंडच्या राजाचें नेतृत्व होतें. नेपोलियनशीं युद्ध चालू असतांना इंग्लंडांत झालेल्या औद्योगिक क्रांतीची झळ हॉलंडलाहि लागली. इंडो-

नेशियांत इंग्लिश माल व डच माल अशी स्पर्धा राहूं नये यासाठीं परदेशी मालावर जबर जकाती बसविण्यांत आल्या. या धोरणामुळें १८१८ सालीं इंडोनेशियांत आयात होणाऱ्या मालांत डच माल एक-तृतीयांश असे तो १८३० सालीं दोन-तृतीयांश झाला. डचांच्या या बनियेगिरीमुळें इंडो नेशियन किसान व व्यापारी असंतुष्ट झाले.

इंडोनेशियन शेतकऱ्यांतील या असंतोषाचा भडका उडावयास वेळ लागला नाहीं. १८२० सालापासून इंडोनेशियनांच्या असहकारामुळें या वसाहतीच्या अंदाजपत्रकांत तूट दिसून येऊं लागली. १८२५ ते १८३० पर्यंत डचांचें अबदुल हमिद दिपोगोरो याच्याशीं जावामध्यें युद्ध चालू होतें. १८२१ ते १८३८ पर्यंत टेंकू इमाम बोंडपोल या सुमात्रांतील मिनाग-कबू जमातीच्या पुढाऱ्यांशीं लढाई चालू होती. या लढायांचा वाढता खर्च, दरसाल अंदाजपत्रकांत येणारी तीन कोटींची तूट व बेल्जम विभक्त झाल्यामुळें झालेलें नुकसान भरून काढण्यासाठीं राजानें आपला वसाहत-मंत्री बॉड याचा सल्ला ऐकून फॉन डेन बॉश याची नवी व्यवस्था लावण्यासाठीं, इंडोनेशियांत रवानगी केली. वसाहतीची शास्त्रशुद्ध व योजनाबद्ध पिळवणूक कशी करतां येईल हें बॉशनें ठरविलें. त्याची योजना म्हणजे कंपनीच्या वेळच्या व्यापारी धोरणाचें पुनरुज्जीवन होय. मात्र त्या काळीं सर्व नफा कंपनीच्या भागीदारांच्या खिशांत जात असे, तो सरकारी खजिन्यांत जमा होणार, एवढाच फरक होता.

## जमिनीवर सरकारी मालकी

नवीन योजनेप्रमाणें वार्षिक उत्पन्नाच्या दोन-पंचमांश कर देण्याऐवजीं शेत-कऱ्यांना एक पंचमांश जमिनी सरकारच्या स्वाधीन कराव्या लागल्या. तितकेंच कामहि सरकारसाठीं त्यांना करावें लागे. या जमिनींवर विनावेतन मशागत करून घेऊन सरकारनें कांहीं धान्यें लावलीं. हें धान्य विकण्यासाठीं हॉलंडला

रवाना होई. या धान्याची वाहतुक केवळ डच जहाजांतूनच झाली पाहिजे असा नियम करण्यांत आला होता. अशा रीतीनें ॲमस्टरडॅम जगांतील एक प्रमुख व्यापारी केंद्र बनविण्यांत आलें; व आयात मालावर हॉलंडचे उद्योगधंदे वाढविण्यांत आले. या योजनेमुळें दरसाल इंडोनेशियन अंदाजपत्रकांत येणारी तूट भरून निघाली; इतकेंच नव्हे तर १८७७ सालापर्यंत अंदाजपत्रकांत शिल्लक राहूं लागली.

अंदाजपत्रकांतील ही शिल्लक वसाहतीची वर्गणी म्हणून नियमितपणें हॉलंडला पाठविण्यांत येई. या प्रकारास 'बेटिंग स्लॉट' म्हणत. १८३१ ते १८४० पर्यंत ही रक्कम दरसाल ९३ लक्ष गिल्डर्स भरे. त्यानंतरच्या दहा वर्षांत दरसाल १ कोटि ४१ लक्ष गिल्डर्स हॉलंडला देण्यांत येत. १८७० सालापासून अंदाजपत्रकांत शिल्लक राहणें बंद झालें. त्यानंतर ही पद्धत बंद पडली. मात्र या बेटिंग स्लॉटपासून हॉलंडला ८३ कोटि २० लक्ष गिल्डर्स मिळाले. यापैकीं २३ कोटि ६० लक्ष गिल्डर्स हॉलंडचें कर्ज फेडण्यासाठीं वापरण्यांत आले. १५ कोटि ३० लक्ष गिल्डर्स खर्चून हॉलंड मधील रेल्वे बांधण्यांत आली. १४ कोटि २० लक्ष किल्ल्यांच्या डागडुजी साठीं वापरण्यांत आले व ११ कोटि २० लक्षांचा विनियोग जनतेवरील करभार हलका करण्यासाठीं करण्यांत आला.

सक्तीनें जमीन कसून घ्यावयाच्या ह्या धोरणामुळें हॉलंडचा बराच फायदा झाला असला तरी १८४८ सालीं युरोपांत झालेल्या उदारमतवादी क्रांतीनें या पद्धतींत सुधारणा झाली पाहिजे अशी मागणी होऊं लागली. त्या वेळीं खुल्या व्यापाराच्या धोरणाचा जगभर उदोउदो चालला होता. व्यक्तिस्वातंत्र्याची मागणी करण्यांत येत होती. शेवटीं १८५४ सालीं डच सरकारनें डच ईस्ट इंडिया गव्हर्नमेंट ॲक्ट हा कायदा पास करून इंडोनेशियांतील जमिनी कोणाहि परकीयांस ( डचांनासुद्धां ) विकावयास बंदी केली. मात्र या कायद्यानें सक्तीनें जमिनी कसवून घेण्याची पद्धत बंद

पडली नाहीं. या पद्धतीविरुद्ध ई. डी. डेकर व त्याचे इंडोनेशियन सहकारी यांनीं १८५० पासून चळवळ चालविली होती. त्यामुळें १८६० ऑगस्टपासून नीळ, मिरची व दालचिनी या वस्तूंची सक्तीनें होणारी लागवड बंद करण्यांत आली; म्हणजे तसा कायदा करण्यांत आला. वस्तुतः १९१५ पर्यंत ही पद्धत चालूं होती. १८३० पर्यंत सक्तीनें उंसाची लागवड होत असे व कॉफीची लागवड १९१५ पर्यंत होत होती.

१८७८ सालीं डी. वॉल हा नवा वसाहत–मंत्री अधिकारावर आला व त्यानें सार्वजनिक मालकीच्या जमिनी युरोपियनांस भाडेपट्टीनें द्यावयाची प्रथा पाडली. १८७४ सालीं आयात–निर्यातीवरील जकातींतील विषमता काढून टाकण्यांत आली, त्यामुळें खाजगी उद्योगधंद्यांस व मळेवाल्यांस प्रोत्साहन मिळालें. या खुल्या व्यापारामुळें इंडोनेशियाच्या आर्थिक नाडया कांहीं थोडया डच कंपन्यांच्या हातांत गेल्या.

या मोठमोठ्या डच कंपन्यांना लागणाऱ्या मजुरांची उणीव भरून काढण्यासाठीं १८८० सालीं कूली ऑर्डिनन्स पास करण्यांत आला. या कायद्यानें मजुरांवर बरींच बंधनें लादण्यांत आलीं. एकाद्या मळ्यांत अगर उद्योगधंद्यांत काम करावयाचा करार करून मजुरानें जर तो मोडला तर त्यास या कायद्यानें शिक्षा देण्याची तरतूद करण्यांत आली. याशिवाय आपल्या कामाच्या ठिकाणीं त्यास सक्तीनें पाठविण्याची तरतूद होती.

१८९९ सालीं फॉन डेव्हेंटर या उदारमतवादी डच गृहस्थानें वसाहतीमुळें हॉलंडचा झालेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा लक्षांत घेतां इंडोनेशियन जनतेची सुधारणा करण्यांत यावी असें प्रतिपादिलें. त्याच सालांत आलेल्या नव्या मंत्रिमंडळानें खुल्या व्यापाराचें धोरण बदललें, आणि त्याला कारणहि तसेंच घडलें. याच सुमारास सुमात्रा, बोर्निओ व इतर कांहीं बेटांत तेलाच्या विहिरी सापडल्या. या बाबतींत परकीय स्पर्धा येऊं

नये म्हणून डचांनीं खुल्या व्यापाराचा त्याग केला. १९१३ सालपर्यंत खोदलेल्या सर्व विहिरी डचांच्या ताब्यांत होत्या.

मात्र नव्यानें निर्माण होत असलेल्या या संपत्तीचा डचांनीं फायदा घ्यावयापूर्वींच इंडोनेशियांतील असंतोषामुळें राजकीय चळवळींचा उद्रेक झाला. १९०८ सालीं बुडी उटोमो ही उदारमतवाद्यांची संस्था स्थापन झाली. १९११ मध्यें कट्टर राष्ट्रवाद्यांच्या शरिकत इस्लामचा व १९१२ मध्यें महंमदिजा या धार्मिक व सामाजिक संस्थेचा जन्म झाला. पहिल्या महायुद्धानंतर कामगार संघटना फोफावल्या व त्यांनीं राष्ट्रीय चळवळींत नवा आर्थिक दृष्टिकोन आणला. अशा रीतीनें जागृत होत असलेल्या इंडोनेशियनांस समजाविण्याऐवजीं डचांनीं आपल्या साम्राज्यवादी मनोवृत्तीनें इंडोनेशियांतील असंतोषाच्या आगींत तेल ओतलें. सक्तीच्या मजुरीची पद्धतहि, १९३८ सालीं अमेरिकेनें सक्तीनें लावलेल्या मजुरांनीं तयार केलेला माल घ्यावयास नकार दिला त्यानंतर बंद करण्यांत आली. त्या वर्षींच १८,७०० मजूर अशा प्रकारें काम करीत होते.

कच्च्या मालाचा पुरवठा करणारी व स्वस्त मजूर पुरविणारी भूमि एवढेंच डचांच्या दृष्टीनें इंडोनेशियास महत्त्व होतें. त्यामुळें इंडोनेशियांतील उद्योगधंद्यांच्या वाढीस त्यांनीं जोराचा विरोध केला. १९३० सालानंतर तेथें थोडे स्थानिक उद्योगधंदे निघूं लागले. १९३९ सालीं साडेसात कोटि इंडोनेशियनांपैकीं अवघे २५ लाख औद्योगिक कामगार होते. या मजुरांची मजुरीही अगदीं कमी होती. साधारणतः प्रत्येक मजुरास १० ते २५ सेंटपर्यंत (२॥ ते ६ आणे) मजुरी मिळे. कांहीं कामगार तर याहिपेक्षां कमी, दिवसाला ५ ते १० सेंटवर काम करीत ! या उलट धंद्याची व्यवस्था पहाणाऱ्या डच अधिकाऱ्यांना ३०,००० ते १,००००० डॉलर्सपर्यंत वार्षिक पगार पडे.

## परकीयांचे हितसंबंध

इंडोनेशियांतील तेलाच्या सर्व विहिरी, जस्ताच्या खाणी व इतर धातूंच्या खाणी पूर्णतया डचांच्या मालकीच्या होत्या. शेतीच्या एकूण उत्पन्नापैकीं ६९·३ टक्के उत्पन्न डच व इतर परकीयांच्या मालकीच्या शेतांत होत होतें. उरलेलें ३१·७ टक्के उत्पन्न इंडोनेशियनांच्या मालकीच्या शेतांत होत असे. परंतु आयात-निर्यातीची मक्तेदारी असलेल्या डच कंपन्यांना त्यांना तें विकावें लागे. एकटया सुमात्रांतील ८९ टक्के जमीन मळेवाल्यांच्या ताब्यांत होती जवळजवळ अर्धें सुमात्रा बेट ॲम्स्टरडॅमच्या हँडेल्स विरनिगिग कंपनीकडे भाडेपट्टीनें होतें. अचेहचे एके काळचे लष्करी गव्हर्नर व हॉलंडचे पंत-प्रधान डॉ. कोलीन त्या कंपनीचे अध्यक्ष होते.

इंडोनेशियाच्या आर्थिक जीवनाची नाडी डच भांडवलावर अवलंबून असल्यामुळें इंडोनेशियाची सर्व लूट डचांनींच नेली. जवळजवळ सर्व सरकारी कर्जरोखे डच भांडवलवाल्यांनीं विकत घेतले होते. मागें १९०० सालानंतर इतर देशांनींहि इंडोनेशियांत भांडवल गुंतवावयास सुरुवात केली. १९३८ सालीं इंडोनेशियांत एकूण ४०० कोटि गिल्डर्स ( एक गिल्डर म्हणजे रु. १-१०-० ) परदेशी भांडवल होतें. त्यांतील डचांचें २५० कोटि, ब्रिटिशांचे ४५ कोटि, अमेरिकेचें ३८ कोटि, फ्रान्स—बेल्जमचें १६ कोटि व बाकीचें इतर राष्ट्रांचें होतें. या साऱ्या भांडवलावरील व्याज म्हणून सालिना चार कोटी पौंड इंडोनेशियांतून बाहेर जात.

इंडोनेशियांतील युरोपियनांची वस्ती अवघी ०·४ टक्के; पण सर्व उत्पन्नाच्या ६५ टक्के उत्पन्न ते घेत; इतर आशियावासीयांची वस्ती २·२ टक्के व ते घेत २२ टक्के उत्पन्न, आणि ९७·४ टक्के वस्ती असलेले इंडोनेशियन घेत १३ टक्के ! ७० टक्के लोक छोटीं छोटीं भाताचीं खाचरें, व शिकार यांवर जगत. दिवसांतून दोन वेळां मिळणारी भाताची मूद व मासळीचें कालवण हेंच त्यांचें अन्न. बांबूच्या झोंपडयांत ते राहतात. सर्वसाधारण शेतकऱ्यांचें वार्षिक उत्पन्न तीन पौंड आहे !

# स्वातंत्र्यासाठीं यशस्वी चळवळ (१)

## स्वातंत्र्य-लढ्यास सुरुवात

इंडोनेशियन लोकांनीं मुसलमान धर्म स्वीकारला तरी प्राचीन श्रीविजय व मयोपहित साम्राज्यांबद्दलचा त्यांचा अभिमान बिलकुल कमी झाला नव्हता. महाभारतांतील व्यक्ति ते अद्यापहि आपल्यांत दाखवितात, व बौद्ध अगर हिंदु इंडोनेशियाच्या वेळच्या वैभवाच्या गोष्टी बोलतात. सबंध इंडोनेशियाचें एकराष्ट्रीयत्व प्राचीन काळापासून त्यांच्या रक्तांत भिनलें होतें. हेंच याचें एक कारण आहे.

युरोपियनांच्या आगमनानंतर पाश्चात्य संस्कृतींतील कांहीं चांगल्या गोष्टी त्यांनीं आत्मसात् केल्या. मात्र पोर्तुगिजांनीं ज्या वेळीं धर्मप्रसाराचा प्रयत्न केला त्या वेळीं व डचांनीं आपलें साम्राज्य स्थापन करण्यासाठीं ज्या वेळीं लढाया केल्या त्या वेळीं आपल्या समान शत्रूंशीं झगडण्यासाठीं इंडोनेशियन एक झाले. डचांच्या पिळवणुकीमुळें शेतकरी गरीब होत चाललेला व व्यापाऱ्यांचा व्यापार बसत चाललेला इंडोनेशियनांस सहन झाला नाहीं.

असें असलें तरी इतर वसाहतींच्या मानानें इंडोनेशियांतील राजकीय चळवळींची सुरुवात फार उशिरा झाली. याला बरींच कारणें आहेत. हिंदुस्थानप्रमाणें इंडोनेशियांत स्थानिक भांडवलदार वर्ग निर्माण झाला नव्हता. युरोपियन सोडून दिले तर इंडोनेशियांतील सारा व्यापार इतर आशियावासि यांच्या ताब्यांत होता. हे युरेशियन लोक नेहमीं डचांशीं मिळतें घेत. फिलिपाइन्समधील मध्यमवर्गीय युरेशियनांप्रमाणें साम्राज्यविरोधी युरेशियन्स इंडोनेशियांत नव्हते.

यामुळें इंडोनेशियांतील राजकीय चळवळ अगदीं नवथरची आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातीस विविध प्रकारचें सामाजिक कार्य करणाऱ्या

संस्थाच इंडोनेशियांत होत्या. कांहीं लोक डचांशीं लढण्यासाठीं संघटना करीत, पण ती राजकीय जागृति नव्हती. १९०४ सालीं अचेहच्या सुलतानाचा पराभव झाला. त्यानंतर ९ वर्षे अशा प्रकारचा हत्यारी प्रतिकार चालू होता. १९१३ नंतर मात्र तो साफ थंडावला.

कोणत्याहि प्रकारची राजकीय संघटना नसल्यामुळें डचांनीं केलेल्या कायद्यांचें इंडोनेशियन्स काटेकोरपणानें पालन करीत. उघडपणें अगर जाहीरपणें एखाद्या कायद्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांकडे नापसंती व्यक्त करावयासहि ते धजत नसत.

इंडोनेशियन समाजांत त्या काळीं म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरवातीस एकमेकांपासून संपूर्णपणें अलग पडलेले तीन थर होते. पहिला डचांचा, दुसरा इंडोनेशियन सरकारी अधिकाऱ्यांचा (प्रियाईंचा) व तिसरा सामान्य माणसांचा. डच गोरे म्हणून स्वतःस श्रेष्ठ समजत. दुसरे सरकारी अधिकारी म्हणून सामान्य माणसांस त्यांस मान द्यावा लागे. तिसरी सामान्य माणसें ! वरच्यांचे हुकूम पाळणें एवढेंच त्यांचें कर्तव्य.

## पहिली जागृति

१९०५ सालीं जपाननें रशियावर मिळविलेल्या विजयामुळें सर्व इंडोनेशियन समाज जागा झाला. त्यांतच जपाननें केलेली प्रगति, १९१२ सालीं चीनमध्यें झालेली लोकसत्ताक राज्याची स्थापना व हिंदुस्थानांतील चळवळ यांची भर पडून संघटित राजकीय चळवळीस सुरवात झाली. १९१२ सालीं चीनच्या लोकशाही क्रांतीनें उत्साहित होऊन डॉ. सूदिरो या इंडोनेशियन गृहस्थानें राजकारणाची चर्चा करण्यासाठीं एका क्लबची स्थापना केली.

वर्तमानपत्रांत लेख लिहून कांहीं युरोपियनांनीं राजकीय स्वरूपाच्या मागण्या केल्या. १८५४ सालीं करण्यांत आलेल्या एका कायद्यान्वयें

कोणत्याहि राजकीय पक्षाची स्थापना करावयास वा सभा घ्यावयास बंदी होती. १९०३ सालच्या कायद्यान्वयें ही बंदी दूर करण्यांत आली. याच कायद्यानें थोडीशी सत्ता असलेलीं शहरमंडळें (नगरपालिका) स्थापन करण्यांत आलीं व कांहीं बाबतींत राजकीय चळवळी करावयास परवानगी देण्यांत आली. डच शिक्षण घेतलेल्या सुशिक्षितांनीं या परिस्थितीचा बराच फायदा घेतला.

राजकीय चळवळीस प्रथम सुरुवात जाकार्ता येथील वैद्यकी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं केली. इंडोनेशियनांचा सामाजिक दर्जा वाढावा यासाठीं शाळांतील विद्यार्थ्यांनीं आपले संघ स्थापन करावेत अशीं विनंतिपत्रकें त्यांनीं सर्व शाळांतून पाठविलीं. या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नानें अखेर २० मे १९०८ रोजीं बुडी उटोमो या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचा पुढारी डॉ. सुमोटो हा पुढें मोठा पुढारी झाला. थोड्या दिवसांत जावांतील इतर प्रमुख शहरीं या संस्थेच्या शाखा काढण्यांत आल्या. ८ ऑक्टोबर १९०८ रोजीं मतारम येथें संस्थेची पहिली परिषद बोलविण्यांत आली.

बुडी ऊटोमोची स्थापना हा इंडोनेशियांतील राजकीय चळवळीचा जन्म होय. ही संस्था इतकी लोकप्रिय झाली कीं, अवघ्या एका वर्षाच्या अवधींत संस्थेची सभासद–संख्या दहा हजारांवर गेली. मात्र हे सर्व सभासद सरकारी नोकरींतील म्हणजे समाजांतील वरच्या वर्गांतले होते. त्यामुळें ही संस्था सामान्य जनतेपर्यंत कधींच पोचली नाहीं. राजकीय चळवळींशिवाय राष्ट्रीय शाळा काढणें व शिक्षणाचा प्रसार करणें हीं कार्येंहि या संस्थेनें केलीं.

## शरीकत इस्लामची स्थापना

इंडोनेशियांतील बहुजनसमाज मुसलमानी धर्माचा असल्यामुळें त्यांच्यांत जागृति करावयास धर्माचाच आश्रय घेणें भाग होतें. १९०९ सालीं

जाकार्ता येथें आर. एम्. तिर्तोदिसूरज यानें शरीकत डगांग इस्लाम (मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स) या संस्थेची स्थापना केली. १९११ सालीं त्यानें व शेख अहमद बाजेनेट यानें बोगोर येथें दुसरी शरीकत डगांग इस्लाम स्थापन केली. मात्र हे दोनहि प्रयत्न अयशस्वी झाले. त्याच सुमारास हाजी समन हुडो या सोलो येथील एका व्यापाऱ्यानें तिसरी शरीकत डगांग इस्लाम स्थापन केली. या संस्थेस मात्र कमालीचें यश मिळालें. या संस्थेची पार्श्वभूमि धार्मिक असली तरी कार्य मात्र सामाजिक व राजकीय होतें. कांही दिवसांनीं हाजी उमर सैद टोक्रोमिनोटो यांच्याकडे या संस्थेचें नेतृत्व गेलें. त्यांनीं १९१२ सालीं संस्थेचें नांव बदलून शरीकत इस्लाम असें सुटसुटीत नांव ठेवलें. आपल्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९३४ सालपर्यंत त्यांनीं या संस्थेचें नेतृत्व केलें.

२६ जानेवारी १९१३ रोजीं सुरबाया येथें टोक्रोमिनोटोच्या अध्यक्षतेखालीं शरीकत इस्लामची पहिली कॉंग्रेस भरली. या वेळीं शरीकत इस्लाम ही राजकीय चळवळ करणारी संघटना नसल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें. असें असलें तरी या वेळपर्यंत शरीकत इस्लाम ही सामान्य जनतेची चळवळ झाली होती. पांच वर्षांच्या कालावधींत संस्थेची सभासदसंख्या आठ लाखांवर गेली.

संस्थेची ही स्थिति १९१६ सालपर्यंत राहिली. त्यानंतर मात्र या संस्थेचें राजकीय संघटनेंत रूपांतर झालें. १७ जुलै ते २४ जुलै १९१६ पर्यंत भरलेल्या शरीकतच्या कॉंग्रेसमध्यें या संस्थेनें राजकीय कार्यास वाहून घेण्याचें जाहीर केलें. नेदरलंड्स् व इंडोनेशिया यांचा एक संघ असावा हें संघटनेचें ध्येय ठरविण्यांत आलें. १९१७ सालीं भरलेल्या कॉंग्रेसमध्यें इंडोनेशियासाठीं संपूर्ण स्वातंत्र्य मिळविणें हें ध्येय ठरविण्यांत आलें.

## व्होल्कस्राडची स्थापना

शरीकतच्या व दुसऱ्या अनेक पक्षांच्या वाढत्या दडपणामुळें व बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें इंडोनेशियांत थोडेसे अधिकार असलेलें कां होईना व्होल्कस्राड ( पीपल्स कौन्सिल ) स्थापन करावें लागलें. १८ मे १९१८ रोजीं गव्हर्नर जनरल फॉन लिंबर्ग स्टीरम यांच्या हस्तें व्होल्क स्राडचें उद्घाटन झालें. पहिल्या व्होल्कस्राडमध्यें शरीकत इस्लाम, बूडी ऊटोमो, या दोन प्रमुख पक्षांशिवाय सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टी, इंडोनेशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टी, इंडोनेशियन पार्टी वगैरे पक्षांचे प्रतिनिधि होते.

व्होल्कस्राड या शब्दाचा अर्थ जनसभा असा होतो. पण या सभेचें कार्य केवळ सल्लागार मंडळाचें होतें. ६० सभासद व एक अध्यक्ष मिळून या सभेंत ६१ सभासद असत. त्यापैकीं ३८ जनतेनें निवडलेले व २३ सरकारनियुक्त होते. या सभेंत ३० इंडोनेशियन्स, २५ युरोपियन व ५ युरेशियन राहतील अशी घटनेंतच तरतूद होती.

या वेळीं सर्व इंडोनेशियाचा प्रमुख राजप्रतिनिधि म्हणून गव्हर्नर जनरल असे. त्याला मदत करण्यासाठीं एक सल्लागार मंडळ होतें. या सल्लागार मंडळांतील प्रत्येक खात्याचा प्रमुख वैयक्तिकरीत्या गव्हर्नर जनरलला जबाबदार असे. व्होल्कस्राडनें मंजूर केलेलें कोणतेंहि बिल फेंटाळून लावण्याचा गव्हर्नर जनरलला अधिकार होता. व्होल्कस्राडनें नामंजूर केलेला कायदा आपल्या अधिकारांत तो जारी करूं शकत होता.

परंतु व्होल्कस्राडची घटनाच अशी होती कीं, तेथें सहसा कोणतेंहि सरकारी बिल नामंजूर होत नसे. चुकून एखाद्या वेळीं एकादें बिल नापास झालेंच तर सहा महिन्यांनीं थोड्याशा दुरुस्त्यांसह तें मंजूर करून घेण्यात येई. इंडोनेशियाच्या वार्षिक अंदाजपत्रकाला हेग येथील स्टेट्स् जनरलची

संमति लागे. अंदाजपत्रकाबाबत मतभेद झाल्यास शेवटची सत्ता या स्टेट्स जनरलला होती. व्होल्कस्राडमधील ३० इंडोनेशियनांपैकीं २० लोक सिटी कौन्सिल व लोकल कौन्सिलतर्फे निवडलेले असत. उरलेले १० सरकारी नोकरांमधून गव्हर्नर जनरल नेमी.

अशा व्होल्कस्राडमधील पहिल्या सभेंत १५ नोव्हेंबर १९१८ रोजीं शरीकत इस्लाम, सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टी व बूडी ऊटोमो या तीन पक्षांनीं 'रॅडिकल कॉन्सेंट्रेशन' नांवाचा एक गट स्थापन केला. ३ डिसेंबर १९१८ रोजीं उजव्या गटातर्फे जायाडिनग्राट, लॅवरटन, रूट, डॉ. शूमन व डॉ. जेकब या सभासदांनीं व्होल्कस्राडमध्यें एक ठराव मांडून व्होल्कस्राडला कायदे करण्याचें व अंदाजपत्रक मंजूर करण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची व सल्लागार मंडळांतील खातेप्रमुखांना व्होल्कस्राडला जबाबदार करण्याची मागणी केली. रॅडिकल कॉन्सेंट्रेशनतर्फे टोकोमिनोटो यांनींहि अशीच मागणी केली. शेवटीं सरकारनें सुधारणा करण्यासाठीं एक कमिशन नेमण्याचें आश्वासन दिलें.

डचांशीं सहकार्य करून घटनात्मक प्रगति करून घेण्याचें राजकारण अयशस्वी झाल्यावर रॅडिकल कॉन्सेंट्रेशननें व्होल्कस्राडमधून राजीनामे द्यावयाचें ठरविलें. शरीकत इस्लामनें या बाबतींत पुढाकार घेतला. या राजीनामा दिलेल्या सभासदांपैकीं डाव्या गटाच्या सभासदांनीं एक होऊन इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. या नव्या घडामोडीमुळें १९१८ नंतर स्वातंत्र्यासाठीं क्रांतिकारक व असहकाराची चळवळ सुरू झाली.

## जहालांचें नवें नेतृत्व

व्होल्कस्राडमधील रॅडिकल कॉन्सेंट्रेशनचा प्रयोग अयशस्वी झाल्यावर त्याची प्रतिक्रिया राजकीय आंदोलनास क्रांतिकारक स्वरूप येण्यांत झाली.

डचांशीं सहकार्य करून स्वायत्तता मिळवितां येईल या कल्पनेवरील जनतेचा विश्वास उडाला. याचें पर्यवसान 'जहाल विचारसरणीच्या नेत्यांकडे इंडोनेशियन जनतेचें नेतृत्व जाण्यांत झालें.

एफ्. ई. डी. डेक्करनें इंडोनेशियांत प्रथम समाजवादी विचारसरणी आणली. मात्र युरोपियनांतूनच त्यानें आपल्या संस्थेचे सभासद मिळविले. ज्यांची मातृभूमि इंडोनेशिया त्यांचा इंडोनेशिया ही त्याची घोषणा होती. त्यानें आपल्या संघटनेंत इंडोनेशियनांस घ्यावें म्हणून हेंड्रिक स्निव्हेलाइटनें खूप प्रयत्न केले. या प्रयत्नांत अयशस्वी झाल्यावर स्निव्हेलाईटनें 'इंडीज सोशल डेमोक्रॅटिक क्लब'ची स्थापना केली. डेक्करचे बरेच सहकारी स्निव्हे-लाईटच्या या संघटनेंत सामील झाले.

स्निव्हेलाइटनें मार्क्सवादाचा, रशियन क्रांतीचा कसून अभ्यास केला होता. इंडोनेशियांत रशियन क्रांतीप्रमाणें क्रांति करावी हें त्याचें जीवनध्येय होतें. थोड्याच अवधींत शरीकत इस्लामच्या सेमरांग शाखेचा सॅमाऊन हा मार्क्सवादानें वेडावलेला तरुण स्निव्हेलाईटच्या या संघटनेस मिळाला. या सॅमाऊननें शरीकतनेंच मार्क्सवादाचा स्वीकार करावा यासाठीं जंग जंग पछाडले होते.

समाजवाद इंडोनेशियनांस नवीन होता. स्निव्हेलाईटनें या नवीन कल्पनांचा जोरानें प्रचार केला; परंतु शरीकत इस्लामसारख्या जुन्या व लोकप्रिय संघटनेशीं त्याला सामना द्यावयाचा होता. शरीकत इस्लामची लोकप्रियताहि त्या वेळीं अगदीं शिगेस पोंचली होती. इंडोनेशियन बेटां-वरील सर्व लहानमोठ्या केंद्रांत तिच्या सुसंघटित शाखा होत्या. तिची सभासद-संख्या २५ लाख होती.

याशिवाय शरीकत ही शुद्ध भांडवलदारी संस्था नव्हती. मुसलमान धर्मांतील समाजवादाचा तिनें सतत पाठपुरावा केला होता. कांहीं थोड्या

भांडवलवाल्यांच्या हातांत सर्व राज्याच्या आर्थिक नाडया जाव्या हें तिला मान्य नव्हतें. त्यांतच सॅमाऊनसारख्या मार्क्सवाद्यानें केलेल्या प्रचाराचा परिणाम झालाच होता. १९१८ सालीं झालेल्या शरीकतच्या अधिवेशनांत 'जुलमी भांडवलशाहीशीं लढा' व 'कामगार–वर्गाची एकजूट' या घोषणा स्वीकारण्यांत आल्या होत्या. यामुळें कम्युनिस्टांच्या चळवळीचीं पाळेंमुळें कशींच खोलवर रुजलीं नाहींत. कामगार–वर्गांत मात्र कम्युनिस्टांना पाठिंबा मिळाला.

'इंडीज सोशल डेमोक्रॅटिक क्लब' मध्यें सॅमाऊन सामील झाल्यावर त्यानें इंडोनेशियन लष्कर व आरमारास बंड करावयास प्रोत्साहन दिलें. शेवटीं त्यास पकडून डचांनीं हद्दपार केलें. मात्र सॅमाऊननें सुरू केलेलें कार्य टान मलाका, अलिमिन यांनीं पुढें चालू ठेवलें. २३ मे १९२० रोजीं भरलेल्या 'इंडीज सोशल डेमोक्रॅटिक क्लब' चें नांव बदलून 'पार्टाय कोमिनिस इंडोनेशिया' असें ठेवण्यांत आलें. स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावरहि कम्युनिस्ट शरीकतमध्यें होतेच. ही संस्था आपल्या ताब्यांत घ्यावयाचा प्रयत्न फसल्यावर त्यांनीं या संस्थेचें जनतेंतील वजन कमी व्हावें म्हणून प्रयत्न केले. प्रथम त्यांनीं बऱ्याच कामगार संघटना आपल्या छायेखालीं आणल्या. 'रेल रोड एम्प्लॉइज' ही संघटना त्यांनीं प्रथम मिळविली.

कम्युनिस्टांच्या वाढत्या वर्चस्वामुळें शरीकत इस्लामचें महत्त्व कमी कमी होत गेलें. १९२१ नंतर तर सर्वांत लोकप्रिय संघटना हें तिचें स्वरूप पार गेलें. शेवटीं आपल्या संघटनेंतून कम्युनिस्टांची हकालपट्टी करण्याचें शरीकतच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें. २१ ऑक्टोबर १९२१ सालच्या अधिवेशनांत अबदुल मुइस यानें शरीकतचा सभासद दुसऱ्या कोणत्याहि पक्षाचा सभासद असतां कामा नये असा ठराव मांडला. १९२२ च्या अधिवेशनांत हा ठराव मंजूर झाला. त्यामुळें सर्व कम्युनिस्ट आपल्या पक्षांत गेले व त्यांनीं देशभर संप व हरताळ यांची एकच धमाल उडवून दिली. १९२० ते १९२७ पर्यंतच्या काळांत ही चळवळ बरीच जोरांत होती.

कम्युनिस्टांना शरीकत इस्लाम सोडावी लागली तरी शरीकतमध्यें डाव्या गटाचें प्राबल्य होतेंच. या डाव्या गटांत कामगार पुढारी व कित्येक छुपे कम्युनिस्टहि होते. १९२३ सालीं शरीकतच्या सर्व शाखांच्या निवडणुकी डाव्या गटानें जिंकल्या. शेवटीं कंटाळून उजव्या गटानें 'पार्टाय शरीकत इस्लाम इंडोनेशिया' असें नांव देऊन शरीकतची पुनर्घटना केली. डाव्या गटानें 'शरीकत रजत मेराह' या नांवानें आपली संघटना काढली. या 'शरीकत रजत मेराह' संघटनेनें व कम्युनिस्टांनीं १९२६-२७ सालीं कामगार क्रांतीचा अयशस्वी प्रयत्न केला.

## पहिली अयशस्वी क्रांति

१९२६ सालपर्यंत इंडोनेशियन कामगार—वर्गांत कामगार चळवळ चांगलीच रुजली होती. १९१२ सालीं सूरबाया व सूराकार्ता येथें संप होऊन कामगार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. १९१७ मध्यें शुगर प्लँटर्सशीं जमीनदारांचा झगडा झाला. यानंतर शरीकत इस्लामनें कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. त्यानंतरची कामगारांची महत्त्वाची संघटना म्हणजे सेमाऊनची 'रिव्होल्युशनरी ट्रेड युनियन' ही होय. १९१९ सालीं सर्व कामगार संघटनांची एक मध्यवर्ति संघटना स्थापन झाली. ही संघटना कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालीं होती. त्यांनीं सतत सात वर्षें रेल्वे, सालर कामगार, ट्राम कामगार, मळ्यांतील कामगार यांच्या सामर्थ्यवान संघटना निर्माण केल्या; व १९२६ सालीं संपाचें निशाण उभारलें.

१९२२ सालीं झालेल्या एका संपाबद्दल टान मलाकास हद्दपार करण्यांत आलें. १९२३ सालीं वाहतुक कामगारांचा झालेला संप दडपशाहीचा वरवंटा फिरवून चिरडून टाकण्यांत आला. याच अनुषंगानें डचांनीं अत्यंत जाचक असे कायदे केले. सबंध इंडोनेशियामध्यें सभाबंदी जारी करण्यांत आली. संपास प्रोत्साहन देणें हा गुन्हा ठरविण्यांत आला. सरकारच्या या

दडपशाहीमुळें कामगारवर्ग जास्तीच खवळून उठला; व १९२५ सालीं संपाची वावटळ पसरत चालली. याच काळांत सेमारंग, सूरबाया येथें मोठाले संप झाले. १९२६ सालच्या नोव्हेंबरपासून १९२७ सालच्या जानेवारी-पर्यंत सर्व कामगारांनीं डचांविरुद्ध बंडच पुकारलें होतें. त्यांनीं राष्ट्रीय फौजेची उभारणी केली. ही राष्ट्रीय फौज व सरकारी फौज यांत ठिक-ठिकाणीं चकमकी उडूं लागल्या. जावामध्यें तर या चकमकी सतत सहा आठवडे चालल्या होत्या. बंडखोरांनीं जाकार्तांची टेलिफोन कचेरी ताब्यांत घेतली. सर्वांत शेवटची चकमक सुमात्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील सिलुंग येथें झाली. या सर्व चकमकींत राष्ट्रीय फौजेचा पुरा बीमोड झाला.

राष्ट्रीय फौजेचा बीमोड झाला तरी या बंडास अयशस्वी क्रांति असेंच नांव देणें शोभेल. अपुऱ्या तयारीमुळें ही क्रांति यशस्वी झाली नाहीं. सबंध इंडोनेशियांतील कामगार–वर्गानें या आंदोलनास पाठिंबा दिला होता. या वेळीं डच साम्राज्यवाद्यांनीं केलेल्या दडपशाहीस इतिहासांत तोड नाहीं. हजारोंना अटक करण्यांत आली. १३६० जणांना डच गिनींतील दिगुळ येथें हद्दपार करण्यांत आलें. यामध्यें बहुसंख्य कम्युनिस्ट होते. कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालण्यांत आली.

दिगुळ हें ठिकाण शोधून काढण्यांत आलें होतें. याहि ठिकाणीं डचांनीं दोन वेगवेगळे भाग पाडले होते. कमी जहाल नेत्यांना किनाऱ्याजवळच्या प्रदेशांत ठेवण्यांत येई. या ठिकाणची हवा मलेरियाला पोषक असली तरी कैद्यांना सर्व तऱ्हेची मदत मिळूं शके. यामुळें त्यांना जिवंतपणी तरी मातृ-भूमीस जाण्याची आशा असे. दुसरें ठिकाण अगदीं अंतर्गत जंगलांत होतें. हा भाग इतका घनदाट जंगलाचा कीं दिवसासुद्धा तेथें ऊन दिसणें मुष्किल. त्यांतच या भागांत वस्तीहि जंगली लोकांची. त्यांच्याकडून मदतीची तर आशा नसेच, पण उलट जीवें मरण्याची भीति मात्र होती. या ठिकाणीं जाणाऱ्या क्रांतिकारकांना परत मातृभूमीस येण्याची आशाच नव्हती.

सर्व इंडोनेशियन पक्षांनीं या अत्याचाराचा तीव्र शब्दांत निषेध केला. या बंडाची तयारी बराच काळ चालली होती असें म्हणतात. परंतु सुमात्रा-तील एका भागांत वेळ चुकल्यामुळें हें बंड अयशस्वी झालें. मात्र डचांच्या दडपशाहीमुळें चळवळ मंदावली व सर्व क्रांतिकारक संघटना जवळजवळ नामशेष झाल्या.

## स्वातंत्र्यासाठीं यशस्वी चळवळ ( २ )

खुद्द इंडोनेशियातील क्रांतिकारक संघटना जवळजवळ नामशेष झाल्या, तरी हॉलंडमधील इंडोनेशियन विद्यार्थ्यांच्या संघटना चांगल्या जोम धरूं लागल्या होत्या. यांत डॉ. सोकार्नो यांची ' इंडोनेशियन असोसिएशन ' ही प्रमुख होती. १९२४ सालीं या संघटनेस क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झालें. स्वायत्त इंडोनेशियाची मागणी सोडून स्वतंत्र इंडोनेशिया हें या संघटनेचें ध्येय ठरविण्यात आलें. इंडोनेशियन स्वातंत्र्यासाठीं मॉस्कोच्या कॉमि-टर्नशींहि संबंध जुळविण्यांत आला. १९२७ सालीं ही संघटना ब्रुसेल्स येथील ' ॲंटी-कलोनियल लीग ' या वसाहतराष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेची सभासद झाली.

या संघटनेंतील विद्यार्थी इंडोनेशियास परतल्यावर इंडोनेशियांतील सर्व पक्षांची एकी करण्याच्या कामास लागले. १९२७ मध्यें डॉ. सोकार्नो यांनीं आपल्या हॉलंडमधील सहकाऱ्यांच्या साहाय्यानें ' पार्टाय नॅशनल इंडोनेशिया ' ची स्थापना केली. अखेर याच पक्षामार्फत बूडी ऊटोमो, पार्टाय शरीकत इस्लाम इंडोनेशिया वगैरे सर्व राजकीय पक्षांचें ' फेडरेशन ऑफ् दि इंडोनेशियन पोलिटिकल पार्टीज ' या नावानें एकीकरण करण्यांत आलें. या सर्वपक्षीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. सटोमो हे होते. हे गृहस्थ प्रागतिक विचाराचे, दूरदृष्टीचे व सर्वांशीं नेहमीं सलोख्यानें वागणारे होते. त्यांनीं एकदा सेवाग्रामला येऊन महात्मा गांधींचीहि भेट घेतली होती.



संग्रहालय
२८.७०
दा. व.
९९०
३९१

यानंतरच्या कांहीं वर्षांत डॉ. सोकार्नो यांच्या 'पार्टाय नॅशनल इंडोनेशिया' या पक्षाचें वजन बरेंच वाढलें होतें. हल्लींचें इंडोनेशियाचें राष्ट्रगीत 'इंडोनेशिया राया' व तांबडा पांढरा राष्ट्रध्वज या पक्षानेंच शोधून काढला. याच ध्वजाखालीं डॉ. सोकार्नो यांनीं इंडोनेशियन जनतेची जोमदार संघटना केली. या पक्षाची वाढती लोकप्रियता डचांस सहन झाली नाहीं. त्यांनीं डॉ. सोकार्नो व त्यांचे तीन सहकारी यांना १९२९ सालीं कम्युनिस्ट असल्याच्या आरोपाखालीं अटक केली.

१९२९ सालीं अरेबियांत शिकून आलेल्या कांहीं मुसलमान तरुणांनीं 'इंडोनेशियन मुस्लिम पार्टी' ही नवी संघटना काढली. मुसलमान धर्मतत्त्वांवर या पक्षाची घटना आधारण्यांत आली असल्यामुळें या पक्षास जनतेचा बराच पाठिंबा मिळाला. १९३५ सालपर्यंत या पक्षाचें वजन सतत वाढत होतें. शेवटीं याहि पक्षाच्या पुढाऱ्यांना अटक करून डचांनीं त्यांची दिगुल येथें रवानगी केली.

अशा रीतीनें जवळजवळ सर्वच पक्षांचे पुढारी डचांनीं बंदिस्त करून टाकल्यामुळें राजकीय चळवळ थंडावली. गव्हर्नर जनरलनें आपल्या खास अधिकारांत सभा–मिरवणुकींवर बंदी घालून राजकीय चळवळींचा पायाच उखडून काढला. त्यांतच १९३० सालीं आलेल्या आर्थिक मंदीची भर पडली. सरकारला विनंती करणारीं छापील पत्रकेंहि वाटण्यास बंदी घालण्यात आली होती. यावरून दडपशाहीचा वरवंटा किती जोरानें फिरत होता याची कल्पना येईल. अशा नैराश्यमय परिस्थितींत १७ नोव्हेंबर १९३६ रोजीं डॉ. सोकार्नो यांनीं पुढाकार घेऊन स्थापन केलेलें फेडरेशन बरखास्त करण्यांत आलें.

## सनदशीर चळवळींना सुरुवात

यानंतरच्या काळांत सरकारशीं असहकार करून स्वातंत्र्यप्राप्त जाता येणें शक्य नाहीं याची जनतेस जाणीव झाली व सरकारशीं सहकार्य करून

स्वातंत्र्यासाठीं सनदशीर चळवळी करण्याकडे पुढाऱ्यांचा कल स्पष्टपणें दिसून येऊं लागला.

१९२७ सालीं व्होल्कस्राडमध्यें निवडून आलेला थामरिन हा पुढारी या दिशेनें प्रयत्न करून सरकारशीं झगडतच होता. १९३० सालीं व्होल्क-स्राडमधील आणखी नऊ सभासदांच्या सहकार्यानें त्यानें 'नॅशनल फ्रॅक्टी'ची स्थापना केली. या पुढच्या काळांत विरोधी पक्षाचा पुढारी म्हणून तो गाजला.

व्होल्कस्राडच्या बाहेर डॉ. सूटोमोचें नेतृत्वाखालीं 'पार्टाय बंगसा इंडोनेशिया'ची स्थापना करण्यांत आली. या पक्षानें अभ्यास--मंडळांनीं आपल्या कार्यास सुरुवात केली. १९३५ सालीं बूडी ऊटोमो या सर्वांत जुन्या राजकीय पक्षाचें या पक्षांत विसर्जन करण्यांत आलें. 'पार्टाय इंडो-नेशिया राया' या नांवानें सुधारकांनींहि एक नवीन पक्ष स्थापन केला. जहाल पुढाऱ्यांनींहि डॉ. अमीर सुजाफुद्दीन याच्या नेतृत्वाखालीं १९३७ सालीं 'गर्कन रजत इंडोनेशिया' या पक्षाची स्थापना केली. हे सर्व पक्ष सहकारवादी होते. सरकारशीं सहकार्य करतां करतां लढा द्यावयाचा व आपली स्वातंत्र्याची मागणी पुढें रेटावयाची हेंच सर्वांचें धोरण होतें. त्यांच्यांत मतभेद होते ते किती प्रमाणात सहकार्य करावयाचें याबाबतच होते. 'पार्टाय शरीकत इस्लाम इंडोनेशिया' व 'पार्टाय नॅशनल इंडोनेशिया' यांनीं मात्र परिस्थितीला शरण न जाऊन आपलें असहकाराचें धोरण पुढें चालविलें.

१५ ऑगस्ट १९३६ रोजीं व्होल्कस्राडमध्यें इंडोनेशियन जनतेच्या वतीनें डॉ. सूतार्जो यानें स्वराज्यदानासाठीं मुदत ठरवून द्यावी व हें स्वराज्य कसकसें द्यावें याचा विचार करण्यासाठीं डच व इंडोनेशियन यांची परिषद बोलाविण्यांत यावी असा ठराव मांडला. २९ सप्टेंबरला हा ठराव २६ विरुद्ध २० मतांनीं मंजूर करण्यांत आला. १९३८ सालच्या नोव्हेंबरमध्यें इंडोनेशियन जनतेची ही मागणी नामंजूर करण्यांत आल्याचें घोषित

करण्यांत आलें. इंडोनेशियन जनतेस स्वराज्य मागण्याचा अधिकार नाहीं व संमिश्र परिषद बोलावण्याची प्रथा नाहीं अशीं कारणें ही मागणी नामंजूर करतांना सांगण्यांत आलीं.

आपली कमींत कमी मागणीहि नामंजूर करण्यांत आली हें समजल्यावर फिरून एकदां सर्वपक्षीय ऐक्याचे प्रयत्न सुरू झाले. यावेळीं 'पार्टाय इंडोनेशिया राया' या संस्थेनें पुढाकार घेतला. युरोपांत दुसऱ्या महायुद्धास तोंड लागलें असल्यामुळें सर्वपक्षीय ऐक्याची जास्त जरूरी भासूं लागली. युद्धांत डचांचा पराभव झाल्यास आपलें आपल्यास संरक्षण करावें लागेल. त्या परिस्थितीस तोंड देण्याची तयारी असलेली बरी हीहि भावना त्यामागें होती.

शेवटीं २१ मे १९३९ रोजीं जाकार्ता येथें थामरिनच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या परिषदेंत 'गंबूगन पोलिटिक इंडोनेशिया' या नांवाची एक सर्वपक्षीय संघटना स्थापन करण्यांत आली. अमीर सूजाफुद्दिन व टोक्रो सूजोनो यांस या संघटनेचे चिटणीस नेमण्यांत आले. पार्लमेंटरी राजकारणांत थामरिन हा तज्ज्ञ असल्यामुळें हा प्रयत्न बराच यशस्वी झाला. ११ जानेवारी १९४१ रोजीं थामरिन मरण पावला.

या सर्वपक्षीय संघटनेचें पहिलें भव्य अधिवेशन जाकार्ता येथें २९ सप्टेंबर १९३९ रोजीं भरलें. अखिल इंडोनेशियांतून हजारों प्रतिनिधि या अधिवेशनासाठीं जाकार्ता येथें जमले होते. त्यांत सर्व राजकीय संघटनांचे, स्त्रियांचे प्रतिनिधि होते. इतकेंच नव्हें तर पत्रकार संघटनांचेहि प्रतिनिधि होते. या अधिवेशनांत पार्लमेंटची एकमुखी मागणी करण्यांत आली. यासाठीं एक निश्चित मुदत देण्यांत आली होती. या मुदतींत जर पार्लमेंटची मागणी मंजूर करण्यांत आली तर युद्धांत डचांशीं सहकार्य करावयाचें आश्वासन देण्यांत आलें होतें यानंतर एकच महिन्यानें भरलेल्या 'यंग इंडोनेशिया' या तरुणांच्या परिषदेनेंहि पार्लमेंटच्या मागणीस पाठिंबा

दिला. जनतेची ही एकमुखी मागणी अमान्य झाल्यास डचांच्या नोकरींत असणाऱ्या सर्व इंडोनेशियनांनीं आपापल्या जागाचे राजीनामे द्यावे असाहि ठराव या परिषदेंत संमत करण्यांत आला.

सर्वपक्षीय परिषदेच्या व्होल्कस्राडमधील प्रतिनिधींनीं डच सरकारकडे एक अर्ज करावयाचें ठरविलें. २२ नोव्हेंबर १९३९ रोजीं भरलेल्या सर्व-पक्ष परिषदेच्या कार्यकारिणीनें सामुदायिक चळवळ करण्याचा निर्णय घेतला. लहानमोठ्या शहरांतील जनतेनें सभा घेऊन पार्लमेंटची मागणी केली अखेरीस या सर्वपक्ष परिषदेलाच कायम स्वरूप देण्यासाठीं २३, २४, २५ डिसेंबर १९३९ ला अखिल इंडोनेशियन जनतेची एक कॉंग्रेस भरविण्यात आली. या कॉंग्रेसनें तांबडा–पांढरा हा राष्ट्रध्वज म्हणून व इंडोनेशिया राया हें राष्ट्रगीत म्हणून मान्य केलें.

इंडोनेशियन जनतेच्या या मागणीस उचलून धरावयाचें हॉलंडमधील डाव्या गटाच्या पक्षांनीं आश्वासन दिलें शेवटीं डच सरकारनें विस्मन यांच्या अध्यक्षतेखालीं एक चौकशी कमिटी नेमली. सर्वपक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन या मागणीस सामान्य जनतेचा कितपत पाठिंबा आहे याबाबत डच सरकारला अहवाल सादर करणें एवढेंच या कमिटीचें काम होतें. यामुळें या कमिटीनें इंडोनेशियांतील कोणत्याहि राजकीय पक्षाचें समाधान होऊं शकलें नाहीं.

विस्मननें सर्वपक्ष परिषदेच्या कार्यकारिणीशीं वाटाघाटी केल्या. मात्र जर्मनीच्या मगरमिठींतून हॉलंडची सुटका होईपर्यंत इंडोनेशियाची पार्लमेंटची मागणी मान्य करतां येणें शक्य नाहीं, असें कमिटीचें मत असल्यामुळें या वाटाघाटींतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. मध्यंतरीच्या काळांत जपाननें युद्धात भाग घेतला होता. यासाठीं इंडोनेशियाच्या संरक्षणाची कांहीं तरी व्यवस्था झटपट करणें भाग होतें म्हणून गव्हर्नर जनरलनें

लष्कर-भरतीचा कायदा व्होल्कस्राडमध्यें आणला. सर्व राजकीय पक्षांनीं, धार्मिक संस्थांनीं, कामगारांच्या संघटनांनीं यास एकमुखी विरोध केला. १९ जानेवारी १९४२ रोजीं जपाननें इंडोनेशियावरील आक्रमणास सुरुवात केली. मार्च १९४२ ला डचांचा शेवटचा पराभव होऊन इंडोनेशिया जपानच्या अमलाखालीं गेला.

# स्वातंत्र्यासाठीं यशस्वी चळवळ ( ३ )

युद्ध हें आपलें धोरण नसून शांतता हें आपलें धोरण आहे असा जयघोष चालवून जपान्यांनीं अमेरिकेशीं शांततेच्या वाटाघाटी चालूं ठेवल्या होत्या. मात्र या वाटाघाटी चालूं असतानांच ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें पर्ल हार्बर, फिलिपाईन्स व मलायावर हल्ला चढविला. दुसऱ्या दिवशीं व्हिल्हेल्मिना राणीनें लंडनमधून जपानशीं युद्ध पुकारलें. यामुळें इंडोनेशियाची इच्छा असो वा नसो, इंडोनेशियाचें जपानशीं युद्ध जुंपलें. त्याच दिवशीं गव्हर्नर जनरलनें जपानशीं युद्ध पुकारलें असल्याचें जाहीर केलें. आपोआपच स्वतःच्या राष्ट्राचें संरक्षण करण्याची जबाबदारी इंडोनेशियनांवर आली. याच प्रसंगीं सरकार व जनता यांच्यात एकी असण्याची अत्यंत आवश्यकता होती, पण तशी शक्यता नव्हती.

या जबाबदारीचा आपला वांटा उचलण्यासाठीं इंडोनेशियनांनीं 'डेमोक्रॅटिक होम फ्रंट' ही स्वयंसेवक संघटना स्थापन करावयाचें ठरविलें. १२ डिसेंबर १९४१ रोजीं बटाव्हिया येथें भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेनें या 'डेमोक्रॅटिक होम फ्रंट'ची जबाबदारी 'गपीनें' गंगबन पोलिटिक इंडोनेशियाचें छोटें रूप स्वीकारावी असा निर्णय घेतला. त्याच दिवशीं 'गपी'च्या कचेरींतून एक पत्रक काढण्यांत आलें. अंतर्गत संरक्षणाची योजना आखण्यांत यावी, व अशा योजनेंत जनतेचें सहकार्य मिळविण्यासाठीं

निरनिराळया पक्षांच्या पुढाऱ्यांचें सहकार्य घेण्यांत यावें अशी डच गव्हर्नर जनरलकडे या पत्रकांतून मागणी करण्यांत आली. या वेळीं डच सरकार तडजोड करावयास उत्सुक होते.

१५ जानेवारी १९४२ रोजीं सरकारचे प्रतिनिधि व मजलिस रजत इंडोनेशिया या प्रमुख संस्थेचे प्रतिनिधि यांची जोगाकार्ता येथें चार तास बैठक झाली. मजलिस रजत इंडोनेशियाच्या कार्यकारिणीनें प्रसिद्ध केलेला जाहीरनामा व 'गपी'च्या कचेरींतून काढण्यांत आलेलें पत्रक यांबाबत या वाटाघाटी झाल्या. या वाटाघाटींत दोन्ही पक्षांनीं आपापली बाजू स्पष्ट केली. यामुळें एकमेकांबद्दलचे कित्येक गैरसमज दूर होण्यास बरीच मदत झाली. वाटाघाटी समाप्त झाल्यावर मजलिसच्या कार्यकारिणीची बैठक घेण्यांत आली व सरकारशीं पुढील वाटाघाटी करण्यासाठीं सहा सभासदांचें एक वाटाघाट मंडळ नेमण्यांत आलें.

यानंतर अवघ्या चारच दिवसांनीं इंडोनेशिया युद्धाच्या खाईत सांपडला; व सर्व प्रकारच्या वाटाघाटी बंद झाल्या. मात्र २ फेब्रुवारी १९४२ पासून रेडिओवर इंडोनेशिया हा शब्द वापरावयास सुरुवात झाली. 'इंडोनेशिया राया' हे प्रतिबंधित राष्ट्रगीत गावयासहि सुरुवात करण्यात आली.

मध्यंतरीच्या काळांत सरकारनें चालविलेल्या लष्करभरतीचा थोडाफार परिणाम दिसून यावयास लागला होता. हें लष्कर सर्व आधुनिक साहित्यानें सुसज्ज असलें तरी संख्येनें फारच कमी—अवघें ३५००० होतें. कायम स्वरूपाच्या लष्करांतहि थोडीफार भरती करण्यांत येऊन त्याची संख्या ३०००० करण्यांत आली. याशिवाय होमगार्ड व सिटी गार्ड होते व. होमगार्डांचें शिक्षण चालू असतांच युद्धास तोंड लागलें. या सर्व पूर्ण-शिक्षित व अर्धशिक्षित सैनिकांची संख्या जेमतेम लाखापर्यंत होती. टँक-दल तर जवळजवळ नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. ॲंटी एअर-क्रॅफ्ट तोफा

मोठमोठ्या शहरांचें रक्षण करावयासहि असमर्थ होत्या. आरमारात तीन क्रूझर्स, पाच डिस्ट्रॉयर्स, १५ पाणबुड्या व कांहीं लहान नौका होत्या.

१९ डिसेंबर १९४१ रोजीं बोर्निओंतील पॉंटियनाकवर जपान्यांनीं जोराची बॉंबफेक केली. त्यानंतर बऱ्याच ठिकाणीं लढाया लढल्या गेल्या, तरी जपान्यांच्या सुसज्ज लष्करी दलांपुढें इंडोनेशियन फौजाचा निभाव लागला नाहीं; व आपल्या पूर्वनियोजित योजनेप्रमाणें जपानी सैन्य पुढें पुढें सरकूं लागलें. ७ मार्च १९४२ मध्यें बॅंडुइंग पडलें; व जवळजवळ सारा इंडोनेशिया जपान्यांनीं काबीज केला.

या सत्ताबदलामुळें आपल्या देशाचें स्वातंत्र्य मिळविण्याची इंडो-नेशियनांची भावना तीव्र झाली. पूर्वीच्याच एकोप्यानें या नव्या साम्राज्य-सत्तेविरुद्ध आपला स्वातंत्र्य लढा चालवावयाचा त्यांनीं निर्धार केला. प्रथम सर्व राष्ट्रीय गटांनीं जपानशीं असहकार करावयास सुरुवात केली. एक वर्षानंतर या राष्ट्रीय चळवळीचें सामर्थ्य जपानी अधिकाऱ्यांनीं ओळखून जपानी पंतप्रधान जनरल टोजोनें ब्रह्मदेश, फिलिपाईन्सबरोबरच इंडोनेशियालाहि जपान स्वातंत्र्य देईल असें जाहीर आश्वासन दिलें.

१ ऑगस्ट १९४३ रोजीं जनरल हराडानें इंडोनेशियांत हीच घोषणा केली. इंडोनेशियन जनतेनें स्वतःच्या देशाचा राज्यकारभार चालवावयाची वेळ आली आहे, असें ते म्हणाले. जपान्यांनीं देऊं केलेल्या या संधीचा फायदा घेतल्यास आपण आपल्या देशबांधवांची जास्त सेवा करूं शकूं असा दूरगामी विचार करून इंडोनेशियन पुढाऱ्यांनीं या योजनेचा फायदा करून घ्यावयाचें ठरविलें. या सत्तेचा उपयोग करून आपली राष्ट्रीय चळवळ जास्त बळकट करतां येईल व तिच्या जोरावर कालांतरानें आपण जपानी साम्राज्यसत्ताहि उलथून पाडूं हाहि उद्देश या संधीचा फायदा घेण्यामागें होता. आपणांस मिळणारी स्वायत्तता वेगळी आहे याचीहि या पुढाऱ्यांना जाणीव होती.

जपान्यांनीं निर्माण केलेल्या राजवटींत 'दीवान पूसत' या नांवाचें एक मध्यवर्ति कारभारी मंडळ व अनेक स्थानिक मंडळें होतीं. २४ सप्टेंबर १९४३ रोजीं 'दीवान पूसत'ची स्थापना झाली व डॉ. सोकार्नो तिचे अध्यक्ष बनले. कुसूमो उटोजो हे १९१८ पासून व्होल्क्स्राडमध्यें काम केलेले गृहस्थ या मंडळाचे उपाध्यक्ष होते. किजाई मसमन्सूर व की हाजर ड्वाटनारा यांचींहि नावें या मंडळांत होतीं. नवें सैन्य संघटित करणें, देशाची कामगार-शक्ति एकत्रित करणें, सर्व बाबतींत काटकसर जारी करणें हीं कामें लष्करी राजवटीनें या मंडळाकडे सोंपविलीं होतीं.

लष्करी सत्तेच्या बळावर जागतिक वर्चस्व स्थापन करावयाची आपली महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठीं इंडोनेशियाची शक्ति व मनुष्यबळ उपभोगावयाचें हा जपानचा हेतु होता हें उघडच आहे. इंडोनेशियाच्या संरक्षणासाठीं व इंडोनेशियनांच्या हितासाठीं आपण सारें करीत आहोंत असें जनतेला जपानी अधिकाऱ्यांनीं भासविलें होतें. यामुळें भूमिगत जपानविरोधी स्वातंत्र्य-चळवळ बळावली. या ना त्या उपायानें जपान्यांना विरोध करण्यात आला व त्याचे हेतु असफल करण्यांत आले. यामुळें 'दीवान पूसत' या मंडळाच्या द्वारा जनतेचें सहकार्य मिळविण्याची जपान्यांची योजना फसली.

यानंतर जनतेचें सहकार्य मिळविण्याची एक नवीच योजना जपान्यांनीं आखली. 'पूतेरा' ही तरुणांची व दुसऱ्या अशाच संघटना स्थापन करावयास त्यांनीं सुरुवात केली. पूतेरा ही संघटना मार्च १९४३ मध्येंच स्थापन करण्यात आली. जपानशीं सहकार्य करण्यासाठीं जास्तींत जास्त नागरिक तयार करणें हा या संघटनेचा हेतु होता. याशिवाय ही एक नवी राजकीय संघटना व्हावी व पूर्वींच्या सर्व संघटना नामशेष व्हाव्या हाहि जपान्यांचा दुसरा अंतस्थ हेतु होता. डॉ. सोकार्नो याना या संघटनेचे अध्यक्ष करण्यांत आलें. दुसरेहि पुढारी इंडोनेशियन्च होते.

पूतेरा या संघटनेंत सामिल झालेले इंडोनेशियन्स आपले हस्तक होतील ही जपान्यांची कल्पना होती. परंतु थोडयाच अवधींत या संघटनेचें धोरण आपल्या कल्पनेशीं तंतोतंत जमत नाहीं याची जपान्यांना जाणीव झाली. जपाननें चालाविलेल्या अमानुष पिळणुकीस विरोधी अशा वृत्तीची वाढ या संघटनेंत झाली. राष्ट्रीयत्वाची भावनाहि तितक्याच जोरानें फोंफावली. याचप्रमाणें ' मुका-रेला ' या नांवाचें नवें सैन्य निर्माण करण्याचें जपानचे प्रयत्नहि अयशस्वी झाले.

यानंतर जपान्यांनीं पुतेरा व इतर सर्व संघटना बरखास्त केल्या. पण कांहीं झालें तरी आपल्या स्वार्थी हेतूसाठीं जपान्यांना जनतेचें सहकार्य हवें होतें यासाठीं त्यांनीं 'जावा हकोकाई' या नांवाची एक कामगार संघटना स्थापन केली. ही संघटना मात्र संपूर्णपणें जपानच्या वर्चस्वाखालीं होती. पूतेरा ही राष्ट्रीय रंग असलेली संघटना अयशस्वी झाली तरी संपूर्णपणें जपानी असलेली हकोकाई ही संघटना कशी यशस्वी होणार ? शेवटीं पुतेरा या संघटनेचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. परंतु अखेर जपान्यांचे हे सारे प्रयत्न अयशस्वी ठरले.

दोस्तांची सेना आलीच तर प्रतिकार करण्यासाठीं हवी असें जपान्यांना भासवून १९४३ सालीं डॉ. सोकार्नो यांनीं गनिमी सैनिकांची संघटना करावयास सुरुवात केली. जपान्यांचा पराभव होण्यापूर्वीच इंडोनेशियांत क्रांति घडवून आणून जपानची सत्ता उलथून पाडण्याचा डॉ. सोकार्नो यांचा इरादा होता. डॉ. सोकार्नो यांच्या या गनिमी सैनिकांशिवाय कांहीं भूमिगत संघटनाहि होत्याच. डॉ. अमीर सुजाफुद्दिन व डॉ. स्युतन शहरीर हे दोन प्रमुख पुढारी भूमिगत होते. भूमिगत संघटनांत ' इंडोनेशियन यूथ असोसिएशन ' ही प्रमुख होती. यांत विद्यार्थी व इतर नोकरवर्गाचा बराच मोठा भरणा होता. बांबूचे भाले घेतलेल्यांची

' बारिसन बार्टेंग रजत ' ही दुसरी भूमिगत संघटना होती. आधुनिक युद्धांत तरबेज होण्यासाठीं ते जपानी संरक्षक दलांत सामील झाले होते.

जनतेचें सहकार्य मिळविण्याचे आपले सारे प्रयत्न अयशस्वी झाले. उलट या संधीचा इंडोनेशियन पुढारी राष्ट्रीय क्रांतीसाठीं फायदा करून घेत आहेत हें पाहून फेब्रुवारी १९४४ मध्यें जपान्यांनीं ' दीवान पूसत ' हें वरिष्ठ मंडळ बरखास्त केलें. जपान्यांनीं हें मंडळ बरखास्त केलें यांतच डॉ. सोकार्नो यांच्या कार्याचें रहस्य आहे. जपानशीं सहकार्य करतों असें भासवून त्यांना क्रांतीची तयारी करावयाची होती. आपल्या भूमिकेचें स्पष्टी-करण करण्यासाठीं ते म्हणतात, ' आम्ही जपान्यांचा व सर्व तऱ्हेच्या लष्करी राजवटीचा धिक्कार करतों. पण आमची स्वातंत्र्याची तहान एवढी जबर होती कीं अगदीं घाणेरड्या हातानें तें मिळालें असतें, तरी तें स्वीकारावयाची आमची तयारी होती. ''

१५ ऑगस्ट १९४५ रोजीं जपाननें शरणांगति दिली. जपानच्या शरणागतीनंतर डॉ. सोकार्नो, त्यांचे सहकारी व पिपल्स आर्मीनें सर्व सत्ता आपल्या हातांत घेतली. पिपल्स आर्मीनें तर जपान्यांशीं ठिकठिकाणीं लढाया देऊन जपानी सैनिकाना पकडलें. याच लढायात जपान्यांची अगणित युद्धसामुग्री पिपल्स आर्मीच्या हातांत पडली. यानंतर दोनच दिवसांनीं जपानी अधिकाऱ्याच्या कडव्या विरोधास न जुमानतां इंडोनेशियनांनीं आपलें स्वतंत्र प्रजासत्ताक स्थापन केल्याची घोषणा केली. या पहिल्या प्रजासत्ताकाचे डॉ. सोकार्नो याना अध्यक्ष निवडण्यांत आलें. डॉ. महंमद हाटा यांना उपाध्यक्ष निवडण्यांत आले. सर्व जनतेची प्रातिनिधिक असलेली 'इंडोनेशियन इंडिपेन्डन्स प्रिपरेटरी कमिटी' स्थापन करण्यात आली. प्रजासत्ताकाची घोषणा झाल्यावर जपानी गुप्तहेरखात्यानें डॉ. सोकार्नो व हाटा यांना पकडण्याचे हुकूम सोडले होते! प्रजासत्ताकाच्या घोषणेनंतर दोनच दिवसांनीं ' यूथ असोसिएशन' या भूमिगत संघटनेनें नव्या प्रजासत्ताकास आपण एकनिष्ठ राहूं

असें जाहीर केलें. डच लष्करांतील इंडोनेशियन अधिकाऱ्यांनीं प्रजासत्ताकास पाठिंबा देऊन प्रजासत्ताकाच्या मदतीस उभे राहण्याची तयारी दर्शविली.

# प्रजासत्ताकाची स्थापना

१५ ऑगस्ट १९४५ रोजीं इंडोनेशियन जनतेच्या वतीनें डॉ. सोकार्नो यांनीं प्रजासत्ताकाची घोषणा केली. चाळीस वर्षें इंडोनेशियन जनतेनें चालविलेल्या राष्ट्रीय चळवळीचा हें प्रजासत्ताक हा एक परिपाक होता. युद्धपूर्व कालातील सर्व राजकीय पक्षांतील प्रतिनिधि घेऊन डॉ. सोकार्नो यानीं 'इंडोनेशियन इंडिपेन्डन्स प्रिपरेटरी कमिटी' नेमली. डचांच्या पुनरागमनास विरोध करणें या भूमिकेवर सारे पक्ष एक झाले होते. यामुळें प्रजासत्ताक व प्रजासत्ताकाचे अध्यक्ष डॉ. सोकार्नो व उपाध्यक्ष डॉ. महंमद हाटा यांना साऱ्या इंडोनेशियनांचा पाठिंबा होता.

प्रथम प्रजासत्ताकासाठीं एक तात्पुरती घटना तयार करण्यांत आली. या घटनेंत इंडोनेशिया हें एक संघराज्य असून सर्वतोपरी सत्ता जनताधिष्ठित असल्याचें जाहीर करण्यात आलें होतें. सर्व नागरिकांना राजकीय व न्यायाबाबतचे समान अधिकार मिळतील; संघटना-स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य वगैरे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य राहील असें आश्वासन देण्यांत आलें होतें. प्रत्येक नागरिकाला शिक्षण मिळण्याचा हक्क आहे, हें स्पष्ट नमूद केलें असून सर्वसामान्य नागरिकांच्या हिताची अर्थव्यवस्था जारी करण्यात येईल; महत्त्वाच्या उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल; भूगर्भांतील संपत्ति सरकारच्या मालकीची करण्यांत येईल. गरीब व पोरक्या मुलांची सरकार काळजी घेईल, वगैरे गोष्टींची तरतूद घटनेंतच करण्यांत आली होती. तांबडा व पांढरा हा राष्ट्रध्वज, 'इंडोनेशिया राया' हें राष्ट्रगीत व भाषा इंडोनेशियन ही या प्रजासत्ताकाची राष्ट्रभाषा ठरविण्यात आली.

कैक वर्षांनंतर इंडोनेशियांत लोकशाहीची स्थापना झाली ही गोष्ट खरी असली तरी इंडोनेशियन जनतेस लोकशाहीची कल्पना मात्र नवी नव्हती. डचांच्या आगमनापूर्वीपासून 'देश' (इंडोनेशियन खेडें) लोकशाही तत्त्वावरच संघटित झाले होते. अनेक देश मिळून झालेले बरेच स्वायत्त घटक होते. निवडणूक व मतदान, स्त्री-पुरुषामधील समानता या गोष्टी कायद्यांत नसल्या तरी व्यवहारांत होत्याच.

प्रजासत्ताकाची घोषणा झाल्यावर कांहीं दिवसांनीं 'इंडोनेशियन नॅशनल कन्व्हेन्शन'ची स्थापना करण्यांत आली. या मंडळाचे २५० सभासद होते. डॉ. स्युतन शहरीर हे अध्यक्ष होते. १५ ऑक्टोबर १९४५ ला भरलेल्या या मंडळाच्या अधिवेशनांत एका राष्ट्रीय मध्यवर्ती समितीची निवड करण्यांत आली. मंडळाचें हें अधिवेशन दोन दिवस चाललें होतें. प्रजासत्ताकास स्वतंत्र राष्ट्र म्हणून इतर राष्ट्रांनीं मान्यता द्यावी अशी विनंति या मंडळानें केली. याशिवाय या मंडळानें मंत्रिमंडळांत तरुण रक्त घेण्यांत यावें अशी अध्यक्षांना विनंति केली. शेवटीं डॉ सोकार्नो यांनीं मंडळाचे अध्यक्ष डॉ. शहरीर यांना सध्याची अमेरिकन धर्तीवरची घटना योग्य आहे कीं युरोपियन राष्ट्रांप्रमाणें कॅबिनेट पद्धतीची घटना योग्य याबाबत नॅशनल कन्व्हेन्शनचें मत द्यावयाची विनंति केली. कन्व्हेन्शननें युरोपियन पद्धतीची घटना पसंत केली.

कन्व्हेन्शननें निवडलेल्या राष्ट्रीय मध्यवर्ती समितीची पहिली बैठक १८ ऑक्टोबर १९४५ रोजीं झाली. या समितीनें दोस्तांच्या सेनेला तिचें कार्य पुरें करण्याच्या कामीं इंडोनेशियन जनतेनें सहकार्य द्यावें असा आदेश दिला. जपान्यांना निःशस्त्र करणें व दोस्तांच्या युद्धबंद्यांची सुटका करणें या कामीं आपण दोस्तांच्या सेनापतीशीं सहकार्य करूं अशी घोषणा डॉ. सोकार्नो यांनीं केली. यासाठीं प्रजासत्ताकातर्फे त्यांनीं दोस्त सेनेचे सरसेनानी सर फिलिप खिस्तिसन याना पुढील योजना सुचविल्या——(१) आपुढें

इंडोनेशियन भूमीवर डच सेना उतरतां कामा नये. ( २ ) इंडोनेशियांत असलेली डच सेना काढून घेण्यांत यावी. ( ३ ) डचांची नोकरशाही परत कामावर घेतां कामा नये. ( ४ ) सध्यांच्या प्रजासत्ताकास एक प्रस्थापित सत्ता म्हणून ( डी फॅक्टो ) मान्यता द्यावी.

मध्यंतरीच्या काळांत नॅशनल कन्व्हेन्शनचा निर्णय ग्राह्य मानून डॉ. सोकार्नो यांनीं डॉ. शहरीर यांस मंत्रिमंडळ बनवावयास सांगितलें. २३ नोव्हेंबर १९४५ रोजीं या मंत्रिमंडळाकडे डॉ. सोकार्नो यांनीं सर्व सत्ता दिली. या घडामोडीमुळें फ्रेंच अध्यक्षांप्रमाणें डॉ. सोकार्नो यांचा दर्जा राहिला. प्रजासत्ताकाच्या या पहिल्या मंत्रिमंडळांत डाव्या व उजव्या गटाचे प्रतिनिधी होते. पंतप्रधान डॉ. शहरीर हे त्या वेळीं अवघे ३७ वर्षांचे होते. घरची अत्यंत गरिबी असल्यामुळें आपल्या बहिणीच्या सुखाभूमी येथील शेतावर नारिंगांची लागवड करून जपानी राजवटीच्या वेळीं ते रहात. १९३१ सालीं उच्च शिक्षण घेऊन ते हॉलंडमधून परतले. अत्यंत हुशार विद्यार्थी असल्यामुळें त्यांना बऱ्याच शिष्यवृत्त्या मिळाल्या होत्या व त्या जोरावरच ते हॉलंडला गेले होते. इंडोनेशियांत परतल्यावर डॉ. हाटा यांच्या सहकार्यानें त्यांनीं एका राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली. पण त्यानंतर दोनच वर्षांनीं ते मजूर चळवळींकडे आकर्षिले गेले व ट्रेड युनियन फेडरेशनचे अध्यक्ष बनले. त्यानंतर १९३३ पासून जपानी सत्ता स्थापित होईपर्यंत ते जवळजवळ अटकेंतच होते. जपानी राजवटींत डॉ. सोकार्नो यांच्या सरकारांत जावयास त्यांनीं नकार दिला. मात्र जपानी सत्ता उलथून पाडण्या-साठीं डॉ. हाटा यांच्या सहकार्यानें त्यांनीं एक जोरदार भूमिगत संघटना उभारली. यामुळें स्वातंत्र्य पुकारल्याबरोबर डाव्या गटाच्या एका समाजवादी पक्षाचे प्रमुख म्हणून ते पुढें आले. नॅशनल कन्व्हेन्शनच्या २५, २६, २७ नोव्हेंबर रोजीं भरलेल्या सभेंत यांच्या मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्यात आला. लिंगरजेटी करार होईपर्यंत हे मंत्रिमंडळ टिकलें. मात्र या करारानंतच

मंत्रिमंडळांतील कांहीं मंत्र्याचा विरोध होता. यामुळें डॉ. शहरीर यांनीं आपल्या प्रधानमंडळाचा राजीनामा अध्यक्ष सोकार्नो यांच्या स्वाधीन केला.

हा राजीनामा स्वीकारून डॉ. अमीर सुजाफुद्दिन या डाव्या गटाच्या दुसऱ्या तरुण पुढाऱ्यास मंत्रिमंडळ बनवावयास डॉ. सोकार्नो यांनीं सांगितलें. अमीर सुजाफुद्दिन यांनींहि आपल्या मंत्रिमंडळांत डाव्या गटाचे कांहीं पुढारी घेतले. डॉ. शहरीर यांच्यासारख्या मुत्सद्द्याची सतत मदत व्हावी म्हणून डॉ. सोकार्नो यांनीं त्यांना प्रमुख सल्लागार नेमलें. या भूमिकेवर असतांनाच ते जगाच्या दौऱ्यावर गेले. या दौऱ्यावर असतांना पं. नेहरू यांनीं बोलाविलेल्या आंतरआशिया परिषदेस ते हजर राहिले. प्रजासत्ताकाची बाजू त्यांनीं सर्व पाश्चात्य राष्ट्रांस व विशेषतः युनोमधील मुत्सद्द्यांस पटवून दिली.

नवे पंतप्रधान डॉ. अमीर सुजाफुद्दिन हे तरुणांच्या व किसानांच्या संघटना उभारून प्रथम पुढें आले. १९०७ सालीं सुमात्रा बेटावर एका जमीनदाराच्या कुटुंबांत ते जन्मले. हॉलंडमधून कायद्याची डॉक्टरेट मिळवून परत आल्यावर त्यांनीं राजकारणांत भाग घ्यावयास सुरुवात केली. याबद्दल त्यांस लागलीच अटक करण्यांत आली. ते सुटून आले त्या वेळीं सारे पुढारी तुरुंगांत होते अगर हद्दपार करण्यांत आलेले होते. यामुळें त्यांनीं आर्थिक संशोधन खात्यांत नोकरी स्वीकारली. जपानची सत्ता प्रस्थापित झाल्यावर त्यांनीं क्रांतीसाठीं भूमिगत संघटना उभारावयास सुरुवात केली. याच कामगिरीवर असतांना त्यांस व त्यांच्या ६५ सहकाऱ्यांस जपानी गुप्तहेरांनीं अटक केली. त्यांनीं आपल्या संघटनेची माहिती द्यावी म्हणून तुरुंगांत त्यांचे अनन्वित हाल करण्यांत आले. त्यांना दोनदां देहांताची शिक्षाहि सुनावण्यांत आली, पण डॉ. सोकार्नो यांनीं आपलें वजन खर्च करून ती रद्द करविली. प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर सोकार्नो यांनीं त्यांना माहितीखात्याचे मंत्री नेमले. पंतप्रधान होईपर्यंत माहिती-

खातें व संरक्षणखातें या खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनीं काम पाहिलें होतें. इंडोनेशियांत वक्तृत्वांत डॉ. सोकार्नो यांच्या खालोखाल त्यांचा नंबर लागत असे.

रेनेव्हिल कराराच्या वेळीं मुजाफुद्दिन मंत्रिमंडळांत मतभेद निर्माण झाले. यामुळें त्यांनीं मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. खुद्द त्यांनाहि हा करार संमत नव्हता. यामुळें कांहीं काळानंतर डॉ. सोकार्नो यांनीं डॉ. महंमद हाटा यांस मंत्रिमंडळ बनवावयास सांगितलें. या मंत्रिमंडळाशीं डाव्या गटांनीं असहकार पुकारला. १९०२ सालीं डॉ. हाटा यांचा जन्म झाला. हॉलंडमध्यें डॉ. हाटा डॉक्टरेटचा अभ्यास करीत असतानाच त्यांनीं तेथें इंडोनेशियन विद्यार्थ्यांची एक संघटना उभारली. या संघटनेतर्फे १९२७ सालीं ब्रुसेल्स येथें साम्राज्यशाही विरोधी परिषदेस ते हजर राहिले. याच वेळीं पं. जवाहरलाल नेहरू यांची त्यांनीं ओळख करून घेतली. इंडोनेशियांत आल्यावर इंडोनेशियन नॅशनल पार्टीला ते मिळाले. शेवटीं डचांनीं त्यांस पकडून दिगुल येथें हद्दपार केलें. बंदानेर येथें दुसऱ्यांदा अटकेंत असतांना त्यांनीं अर्थशास्त्र व राजकारण या विषयावर पुस्तकें लिहिलीं. जपानी राजवटीच्या वेळीं राष्ट्रीय चळवळी करावयास मुभा मिळाल्याशिवाय जपान्यांशीं सहकार्य करणार नाहीं असें जपानी लष्करी अधिकाऱ्यांस त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें होतें. प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर त्यांना उपाध्यक्ष करण्यांत आलें. डचांच्या पहिल्या पोलिशी कारवाईच्या वेळीं ते जोगाकार्ताहून सुमात्रांत गेले व तेथून गुप्तपणानें हिंदुस्थानात येऊन पंतप्रधान पं. जवाहरलाल यांची भेट घेतली. पुन्हा सुमात्रांत जाऊन त्यांनीं डचांविरुद्ध लढा चालविला. प्रजासत्ताकाच्या वतीनें ते हॉलंडला हेग गोलमेज परिषदेस हजर राहिले व अखंड इंडोनेशियाचें स्वातंत्र्य मिळवून परत आले.

# प्रजासत्ताकानें केलेलें कार्य

ऑगस्ट १९४५ मध्यें प्रजासत्ताकाची स्थापना झाली. अवघीं चार वर्षे पुरीं झालेल्या या नव्या प्रजासत्ताकानें अडचणींस न जुमानतां आपल्या ताब्यांतील प्रदेशांत कसकशी सुधारणा केली हें पाहणें मोठें मनोरंजक व कौतुकाचें होईल.

सुरवातीस बटाव्हिया येथेंच प्रजासत्ताकानें आपली राजधानी थाटली. मात्र हें बंदर समुद्रावरून होणाऱ्या आरमारी हल्ल्यास उघडें असलेलें पाहून जोगाकार्ता येथें राजधानी हालविण्यांत आली. जोगाकार्ता हें मध्य जावांतील एक मोठें रेल्वे जंक्शन असल्यामुळें दळणवळणाच्या दृष्टीनें तें ठिकाण सोयीचें आहे. इंडोनेशियांतील सांस्कृतिक हालचालींचेंहि तें एक केंद्र आहे. सुरवातीचें तीन लक्ष वस्तीचें हें शहर प्रजासत्ताकाची राजधानी झाल्यापासून दहा लाख वस्तीचें प्रचंड शहर बनलें आहे. परदेशी वार्ताहर पूर्वेकडील एक अतिशय सुंदर शहर म्हणून या शहराचा उल्लेख करतात. या शहरांत तीन विद्यापीठें नुकतीच स्थापन झालीं आहेत.

जपानी लष्करी राजवटींत उध्वस्त झालेल्या प्रदेशाची पुनर्रचना करावयाचें मोठें काम प्रजासत्ताकापुढें होतें. मात्र डचांच्या स्वारीची टांगती तलवार नेहमींच डोक्यावर लटकत असल्यामुळें प्रजासत्ताकास आपली सर्व शक्ति संरक्षणासाठीं खर्च करावी लागली. त्यांतच डचांनीं केलेल्या नाकेबंदीमुळें आपल्या प्रदेशाची पुनर्रचना करण्यांतहि बऱ्याच अडचणी आल्या. डचांच्या लष्करी कारवायांमुळें प्रजासत्ताकाच्या आश्रयास आलेल्या निर्वासितांचा प्रश्नहि सोडवावा लागला. अशा अनेक अडचणी आल्या तरी या नव्या प्रजासत्ताकानें गेल्या चार वर्षांत आपल्या राज्यांत बऱ्याच सुधारणा करून दाखविल्या आहेत.

म. ग्रं. सं. ठाणे ...
क्र. 3259 नों. दि. ...
वि. ...

## राजकीय प्रगति

राजकीय आघाडीवर प्रजासत्ताकानें मिळविलेले विजय नेत्रदीपक आहेत. अफगाणिस्तान व आरब राष्ट्रांनीं या प्रजासत्ताकास सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली. हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, ब्रह्मदेश, चीन, फिलिपाईन्स, हॉलंड, इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांनीं प्रजासत्ताकास एक प्रस्थापित सरकार म्हणून (डी फॅक्टो) मान्यता दिली. नवी दिल्ली, कराची, कॅनबेरा, रंगून, मॅनिला, लंडन, वॉशिंग्टन, सिंगापूर, कायरो आणि मक्का या राजधानींच्या शहरांत प्रजासत्ताकानें आपल्या वकिलाती स्थापन केल्या. ईजिप्तशीं तर एक व्यापारी व मित्रत्वाचा करार प्रजासत्ताकानें केला.

कित्येक आंतरराष्ट्रीय परिषदांना प्रजासत्ताकानें आपले प्रतिनिधि पाठविले. मार्च १९४७ सालीं नवी दिल्ली येथें झालेल्या आंतरआशिया परिषदेस प्रजासत्ताकाचे प्रतिनिधि आले होते. तरुणांच्या व विद्यार्थ्यांच्या संघटनांनीं युरोपांत झालेल्या अनेक परिषदांत भाग घेतला. क्यूबा बेटावरील हवाना येथें झालेल्या आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषदेनें इंडोनेशियन प्रजासत्ताकास सभासद म्हणून मान्यता दिली. युनोच्या सुरक्षा समितींत प्रजासत्ताकाचा एक प्रतिनिधि असून डच प्रतिनिधीच्या बरोबरीनें त्यास मान दिला जातो.

## आर्थिक प्रगति

डचांनीं समुद्रावरून प्रजासत्ताकाची व्यापारी नाकेबंदी केली असली तरी प्रजासत्ताकाने आर्थिक दृष्ट्या आपल्या प्रदेशाची पुनर्रचना करण्यांत बरेंच यश मिळविलें आहे. जपान्यांनीं केलेल्या विध्वंसामुळें बऱ्याच कारखान्यांची नासधूस झाली होती. हे सर्व कारखाने दुरुस्त करण्यांत आले असून कित्येक नवे कारखाने स्थापन करण्यांत आले आहेत. साखरेचे सर्व कारखाने दुरुस्त झाले असून पहिल्या तीन वर्षांत साखरेचें उत्पादन युद्धपूर्वकालाइतकें निघू

लागलें आहे. १९४८ मध्यें क्विनाइनचा एक नवीन कारखाना काढण्यांत आला. मदुरा बेट डचांच्या ताब्यांत गेल्यामुळें मिठाची कमतरता भासूं लागली. ही टंचाई दूर करण्यासाठीं लासेम, पूर्व जावा, आदिकेर्ता, मध्य जावा, बंटेन या ठिकाणीं मीठ उत्पादनास सुरुवात करून मिठाच्या बाबतींत प्रजासत्ताक स्वयंपूर्ण झालें.

युद्धपूर्वकालीं इंडोनेशियास बरेंच कापड आयात करावें लागे. डचांच्या नाकेबंदीमुळें ही आयात बंद झाली. यामुळें या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचा प्रजासत्ताकानें प्रयत्न केला. प्रथम सूराकार्ताभोंवतालीं असलेल्या सुपीक जमिनीपैकीं चार लाख एकर जमिनीवर कापसाची लागवड करण्यांत आली. मेदियन व केदिरी भागांतील आणखी चार लक्ष एकर जमिनीवर नंतरच्या वर्षी कापूस लावण्यांत आला शेतकऱ्यांना केवळ पावसावर अवलंबून राहावें लागूं नये म्हणून बरींच नवीं धरणें बांधण्यांत आलीं.

युद्धकाळांत जपान्यांनीं काढून टाकलेले कांहीं रेल्वेचे रूळ परत बसविण्यांत आले असून रेल्वे वाहतुक सुरळीत चालू करण्यांत आली. अंतर्गत दळणवळणासाठीं नवे रस्ते बांधण्यांत आले. बेटांबेटांमधील दळणवळणासाठीं १०० पासून ३०० टनांपर्यंत बोटी बांधण्याचा कारखाना काढण्यांत आला असून यांतील बऱ्याच बोटी समुद्रांत लोटण्यांत आल्या आहेत.

डॉ. शहरीर यांनीं केलेल्या प्रयत्नांमुळें प्रजासत्ताकाचा परदेशी व्यापार बराच वाढला. १९४७ सालीं शेतीच्या आयुधांच्या बदलीं हिंदुस्थानला तांदूळ पुरविण्याचें प्रजासत्ताकानें कबूल केलें होतें. या करारानें हिंदुस्थानांतील डच अधिकारी सर्दच पडले. हा तांदूळ हिंदुस्थानला जाऊं नये म्हणून जावाची कोंडी करण्याचे हुकूम डच आरमारास देण्यांत आले. हिंदुस्थानशिवाय आशियांतील इतर राष्ट्रें, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व युरोपांतील कांहीं राष्ट्रांनीं प्रजासत्ताकाशीं व्यापार करावयास सुरुवात केली.

## सामाजिक प्रगति

याशिवाय सर्वसामान्य माणसाचें जीवन जास्त सुखकर व्हावें यासाठीं प्रजासत्ताकानें बरेच प्रयत्न केले आहेत. प्रथम नवीं इस्पितळें बांधण्याचें काम हातांत घेण्यांत आलें. एकट्या मेदियन जिल्ह्यांतच २३ इस्पितळें बांधण्यांत आलीं. ठिकठिकाणीं आरोग्य-केंद्रें उघडण्यांत आलीं व या केंद्रांना औषधांचा सतत पुरवठा व्हावा यासाठीं औषधें करण्याचे कारखाने व रसायन-शाळा काढण्यांत आल्या. याच आरोग्य-केंद्रांतून आरोग्यविषयक सर्व माहिती जनतेला विनामूल्य मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली.

युद्धकाळांत पोरक्या झालेल्या मुलांच्या शिक्षणाची व जोपासना करण्याची सर्व जबाबदारी सरकारनें स्वतःवर घेतली; तर कांहीं ठिकाणीं खासगी संस्थांना मदत देऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोंपविण्यांत आली. बालविवाहांना आळा बसावा म्हणून ८ ते १४ वर्षे वयाच्या मुलांना शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें.

पुनर्घटनेच्या कामासाठीं सर्व बेकारांना व विमुक्त सैनिकांना नोकऱ्या देण्यांत आल्या. कामगारांची राहणी जास्त आरोग्यदायी करण्यांत आली. दररोज दुपारीं कमींत कमी एक तास प्रत्येक कामगारानें साक्षरता वर्गास हजर राहिलेंच पाहिजे असा नियम करण्यांत आला. गरोदर स्त्रीस चार महिने पगारी रजा मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. आंतर-आशियांत इंडोनेशियाची माहिती व्हावी यासाठीं प्रत्येक राष्ट्रांत एक लीग स्थापन करण्यांत आली. यामुळें डचांनीं केलेला प्रचार खोटा पडला.

## शैक्षणिक प्रगति

डचांच्या अमदानींत इंडोनेशियांत एकहि विद्यापीठ नव्हतें. फक्त इंजिनियरिंग, मेडिकल व लॉ अशीं तीन कॉलेजें होतीं. प्रजासत्ताकानें थोडक्याच अवधींत तीन विद्यापीठें स्थापन केलीं; आर्ट्स व सायन्सची

कॉलेजें काढलीं; लष्करी शिक्षणाच्या शाळा काढल्या. देशाच्या पुनर्घटनेच्या कामांत तरुणांची मदत व्हावी यासाठीं तांत्रिक शिक्षण देणाऱ्या बऱ्याच शाळा काढण्यांत आल्या. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा तर शेंकडोंनीं निघाल्या. सर्वसाधारण जनतेस शिक्षण मिळावें म्हणून राजकारण, अर्थ-शास्त्र, समाजशास्त्र यांचे 'शॉर्ट टर्म कोर्सेस' सरकारी प्रयत्नानें काढण्यांत आले.

मोठ्या प्रमाणावर साक्षरताप्रसाराची मोहीम काढण्याची एक योजना आंखण्यांत आली. यासाठीं खेडयांतील शिक्षित लोकांस निवडण्यांत आले. त्यांना १५ दिवसांचें शिक्षण देण्यांत आलें व या लोकांकरवीं साक्षरतेचे वर्ग चालविण्यांत आले. सरकारनेंच हें काम आपल्या हातांत घेतल्यामुळें या बाबतींत बरीच प्रगति झाली. एकट्या मेदियन जिल्ह्यात ११९२ साक्षरतेचे वर्ग होते.

प्रजासत्ताकानें हातीं घेतलेली सर्वांत महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे मोठ्या प्रमाणावरील जनतेची हलवाहलव. या योजनेप्रमाणें घनदाट वस्ती असलेल्या जावामधून तुरळक वस्ती असलेल्या सुमात्रा बेटांवर वीस लाख लोक नेण्यांत येतील. यामुळें जावांतील जागेच्या टंचाईचा प्रश्न व सुमात्रांतील मजुरांच्या कमतरतेचा प्रश्न हे दोनहि प्रश्न सुटतील.

# प्रजासत्ताकावरील संकटें

जपाननें शरणागति दिल्यावर इंडोनेशियावर आपलें स्वामित्व फिरून प्रस्थापित करण्याची योजना डचांनीं आंखली. या वेळेपर्यंत इंडोनेशियन जनतेनें आपलें स्वातंत्र्य पुकारलें होतें व या जनतेच्या लोकसत्ताकानें सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली होती. यामुळें चिडून जाऊन इंडोनेशियन जनतेच्या लाडक्या पुढाऱ्यांस डचांनीं जपान्यांचे बगलबच्चे म्हणावयास व

प्रजासत्ताकास जपानी राजवट म्हणावयास सुरुवात केली. इंडोनेशियांतील दोस्त सैन्याचे सरसेनानी जनरल ख्रिस्तिसन यानें प्रजासत्ताकास 'डी फॅक्टो' राजवट म्हणून मान्यता दिली होती. त्यानें डच व इंडोनेशियन यांच्यांत सलोखा करण्याचा प्रयत्न केला पण त्यात तो अयशस्वी झाला. या वेळीं इंडोनेशियांत डचांचें सैन्य नसल्यामुळें त्यांनीं ब्रिटिश फौजेचा उपयोग करून घेतला, व आस्ते आस्ते पहिल्या 'पोलीस ॲक्शन'साठीं मोठें सैन्य उभारलें.

१९४५ च्या नोव्हेंबरमध्यें प्रजासत्ताकानें एक जाहीरनामा काढून डचांच्या कारवायांवर झगझगीत प्रकाश पाडला. यानंतर झालेल्या वाटाघाटींत प्रथम डचांनीं इंडोनेशियनांस आपल्या अधिराज्याखालीं स्वायत्तता देऊं केली. फेब्रुवारी १९४६ मध्यें तर 'कॉमनवेल्थ ऑफ इंडोनेशिया'ला डच साम्राज्यांत बरोबरीचें स्थान देऊं करण्यांत आलें. स्वतंत्र झालेल्या इंडोनेशियनांनीं हें वेगडी स्वातंत्र्य झिडकारलें. या वाटाघाटी चालू असतां प्रजासत्ताकाविरुद्ध डचांच्या लष्करी हालचाली चालूंच होत्या.

एका ब्रिटिश अधिकाऱ्याचा खून झाल्याचें निमित्त साधून ब्रिटिश लष्करानेंहि इंडोनेशियाविरुद्ध चढाई सुरू केली. इंडोनेशियन प्रजासत्ताकाविरुद्ध इंग्लिश फौज लढते या गोष्टीचा इंग्लंडमध्ये मोठा गवगवा झाला. शेवटीं मजूर सरकारनें ब्रिटिश सैन्यास युद्धतहकुबीचा हुकूम दिला व ३० नोव्हेंबर १९४६ पूर्वी ब्रिटिश फौज काढून घेतली जाईल असें जाहीर केलें. या वेळपर्यंत हा प्रश्न सुरक्षा-समितीसमोर आला होता यामुळें डचांनाहि युद्धतहकुबी जाहीर करावी लागली. मध्यस्थीसाठीं ब्रिटननें सर ए. क्लार्क केर यांची इंडोनेशियांत रवानगी केली. त्यांनीं इंडोनेशियन पंतप्रधान डॉ. स्युतन शहरीर यांची व डच गव्हर्नर जनरल डॉ. फॅन मूक यांची भेट घडवून आणली. मात्र इंडोनेशियन प्रजासत्ताकानें फेब्रुवारी योजना स्वीकारावी हा डचांनीं आग्रह धरल्यामुळें या वाटाघाटी फिसकटल्या.

या वाटाघाटी फिसकटल्यानंतर डॉ. फॉन मूक यांनीं सर ए. क्लार्क केर यांच्या सल्ल्यानें दुसरी योजना तयार केली. या योजनेमध्यें जावा, सुमात्रा व मदुरा या बेटांवरील प्रजासत्ताकाची ‘ डी फॅक्टो ’ सत्ता डचांनीं मान्य करावी, व इतर बेटासंबंधीं वाटाघाटी कराव्या या प्रमुख अटी होत्या. ही योजना प्रजासत्ताकानें मान्य केली; म्हणून डॉ. फॉन मूक तीन इंडोनेशियन निरीक्षक बरोबर घेऊन डच सरकारची संमति मिळविण्यासाठीं हॉलंडला रवाना झाले. पण ही योजना डच सरकारलाच संमत झाली नाहीं. जावा बेटावरील जेवढ्या भागांत दोस्त सेना गेली नव्हती तेवढ्या विभागावरची प्रजासत्ताकाची ‘ डी फॅक्टो ’ सत्ता मान्य करावयास डच सरकारची तयारी होती ! इतर प्रदेशांवरची डचांची अधिसत्ता प्रजासत्ताकानें मानावी असेंहि डच सरकारचें म्हणणें होतें.

## लिंगरजेठी करार

या वाटाघाटी बराच काळ चालल्या होत्या. शेवटीं ब्रिटिश सेना काढून घेण्याचा दिवस जसजसा जवळ येत चालला, तेव्हां इंडोनेशियनांशीं समेट करण्यासाठीं त्यांनीं डच सरकारवर वजन खर्च केलें. ऑगस्ट १९४६ च्या अखेरीस लॉर्ड किलर्न यांस इंडोनेशियांत मध्यस्थीसाठीं पाठविण्यांत आलें. डच पार्लमेंटनेंहि प्रो. शॅमर हॉर्न यांच्या नेतृत्वाखालीं एक कमिशन इंडोनेशियांत पाठविलें. या कमिशननें इंडोनेशियन प्रजासत्ताकास एक ‘ डी फॅक्टो ’ सरकार म्हणून मान्यता दिली. आपल्या सरकारला मान्यता मिळाली हें पाहून प्रजासत्ताकानेंहि डॉ. शहरीर यांच्या नेतृत्वाखालीं एक वाटाघाट-मंडळ नेमलें. अशा रीतीनें डॉ. किलर्न यांच्या अध्यक्षतेखालीं डच व इंडोनेशियन वाटाघाटींस ७ ऑक्टोबर १९४६ रोजी फिरून एकवार सुरुवात झाली. १४ ऑक्टोबरला युद्धतहकुबीचा तात्पुरता करार झाला. १५ नोव्हेंबरला दोन्ही पक्षांत समझौता होऊन एक

कायम स्वरूपाचा करार झाला व त्यावर दोन्ही पक्षांच्या सह्या झाल्या. यासच 'लिंगरजेटी' करार म्हणून संबोधण्यात येतें. या करारान्वयें इंडोनेशियन प्रजासत्ताकास डचांनीं जावा, सुमात्रा व मदुरा बेटांवरील 'डी फॅक्टो' सरकार म्हणून मान्यता दिली. या करारांतील इतर कांहीं कलमें खालीलप्रमाणें होतीं.

डच सरकार व प्रजासत्ताक यांनीं एकमेकांच्या सहकार्यानें १ जानेवारी १९४९ पूर्वी इंडोनेशियाचें संयुक्त राज्य निर्मिण्यासाठीं खटपट करावी. या नव्या संयुक्त राज्याचें इंडोनेशियन प्रजासत्ताक, पूर्व इंडोनेशिया व व बोर्निओ हीं घटकराज्यें व्हावींत. नेदरलंड्सचें डच सरकार व सर्वसत्ताधारी इंडोनेशियाचें संयुक्त राज्य यांनीं एकमेकांच्या सहकार्यानें हॉलंडच्या राजाच्या नेतृत्वाखालीं १ जानेवारी १९४९ पूर्वी नेदरलंड्स् इंडोनेशियन युनियनची स्थापना करावी. १ जानेवारी १९४९ पूर्वी प्रजासत्ताकाच्या प्रदेशांतून डच सेना काढून घ्यावयाचें डचांनीं कबूल केलें व प्रजासत्ताकानें परकीयांच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याचें आश्वासन दिलें.

या करारान्वयें डचांनीं इंडोनेशियन प्रजासत्ताकास 'डी फॅक्टो सरकार' म्हणून मान्यता दिल्यावर अमेरिका, इंग्लंड, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश वगैरे राष्ट्रांनीं प्रजासत्ताकास 'डी फॅक्टो' सरकार म्हणून मान्यता दिली. इजिप्त, इराक, सीरिया, लेबेनॉन, सौदी अरेबिया, अफगाणिस्थान व येमान या राष्ट्रांनीं तर कायदेशीररीत्या प्रस्थापित झालेलें सरकार म्हणून 'डी ज्यूरे' सत्ता म्हणून प्रजासत्ताकास मान्यता दिली. प्रजासत्ताकानेंहि या प्रत्येक राष्ट्रांत आपले प्रतिनिधी नेमले.

प्रजासत्ताकाविरुद्ध लष्करी आक्रमण करावयास वेळ मिळावा एवढाच हा करार करण्यामागें डचांचा हेतु होता हें नंतरच्या घडामोडींवरून सिद्ध होतें. हा करार होण्यापूर्वीच बंका बेटावरील पंकल पिनांग येथें डचांनीं प्रजासत्ताकाविरुद्ध एक कारस्थान शिजवीत आणलें होतें. १६ जुलै १९४६ रोजीं

डच अधिसत्तेखालीं इंडोनेशियन राज्यांचें संयुक्त राज्य स्थापन व्हावें म्हणून एक परिषद डचांनीं बोलाविली होती. हीच मॅलिनो परिषद म्हणून प्रसिद्ध आहे. डचांनीं आपल्या हस्तकाकरवीं बरींच बेगडी राज्यें निर्माण करण्याचा निर्णय या परिषदेंत घेतला.

लिंगरजेठी करार झाल्यावर कराराचे आपल्या मताप्रमाणें अन्वयार्थ लावण्यास डच पंडितानीं सुरवात केली. डच राजाचें नेतृत्वाखालीं नेदरलंड्स इंडोनेशियन युनियन याचा अर्थ डच पंडितांनीं डच राजा म्हणजे राजा व त्याचे मंत्री एवढा अभिप्रेत आहे असा आग्रह धरला. व परराष्ट्र-संबंध, संरक्षण, आर्थिक व सांस्कृतिक बाबी या गोष्टीवर राजाची म्हणजे राजा व त्याचे मंत्री याची अधिसत्ता चालेल असें आपलें म्हणणें मांडलें.

मॅलिनो योजनेस मूर्त स्वरूप आणण्यासाठीं व इंडोनेशियाचीं छकलें करून इंडोनेशियावरील आपला ताबा टिकविण्यासाठीं लिंगरजेठी कराराचा भंग करून डचांनीं बाली बेटावरील डेनपासर येथें डिसेंबर १९४६ मध्यें एक परिषद भरविली. या परिषदेंत पूर्व इंडोनेशिया सरकारची स्थापना करण्यांत आली. १२ मे १९४७ रोजीं पश्चिम बोर्निओ व १७ मे रोजीं पूर्व बोर्निओ सरकार स्थापन करण्यांत आलें. पूर्व बोर्निओ सरकार तर बोर्निओतील चार सुलतानाच्या सहकार्यानें स्थापन करण्यांत आलें होतें.

लिंगरजेठी करारान्वयें प्रजासत्ताकाच्या ताब्यांतील प्रदेशांतून आपली सेना काढून घ्यावयाचें डचांनीं मान्य केलें होतें. मात्र त्याऐवजीं त्या विभागांत आपलें सैन्य वाढवावयासच सुरवात केली. या सैन्याच्या बळावर त्या त्या विभागांतील फुटीर प्रवृत्तींना उत्तेजन देण्यांत आलें. करारांतील कलमांस जागून प्रजासत्ताकानें मात्र आपल्या ताब्यांतील एक तृतियांश फौज कमी केली. याशिवाय डचांनीं प्रजासत्ताकाच्या ताब्यांत राहणाऱ्या चिन्यांकरवीं प्रजासत्ताकास विरोधी हालचाली करावयास सुरवात केली.

लिंगरजेटी करारावर सह्या झाल्यानंतर सुरू झालेल्या आर्थिक वाटाघाटींत डचांनीं परदेशी नागरिकांच्या मालमत्तेबाबत मोठेंच काहूर उठविलें. ब्रिटिश व अमेरिकनांचा पाठिंबा मिळविण्याचा डचांचा तो एक डाव होता. या वाटाघाटी चालू असतांनाच डचांनीं प्रजासत्ताकाची आर्थिक कोंडी केली. या वेळपर्यंत प्रजासत्ताकाविरुद्ध आक्रमण करावयाची डचांची सर्व सिद्धता झाली. शेवटीं डचांनीं प्रजासत्ताकाच्या प्रदेशांत डच व इंडोनेशिया यांची संयुक्त सत्ता असावी अशी मागणी केली. ही मागणी मान्य करणें म्हणजे आपल्या स्वतंत्र अस्तित्वावरच घाला असल्यामुळें प्रजासत्ताकाच्या पुढाऱ्यांनीं ती झिडकारली.

याचा फायदा घेऊन डचांनीं २१ जुलै १९४७ रोजीं प्रजासत्ताकाविरुद्ध लष्करी आक्रमण करावयास सुरुवात केली. यानंतर डॉ. फॉन मूक यांनीं प्रजासत्ताकाचे सात सांस्कृतिक घटक पाडावयाची आपली योजना जाहीर केली. या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात म्हणून सुमात्रा बेटांतून बंका, बिलिटन व ऱ्हिओ बेटें फोडून तेथें स्वायत्त सरकार स्थापलें.

डचांनीं प्रजासत्ताकाविरुद्ध लष्करी उपाययोजना केलेली पाहून हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया यांनीं हा प्रश्न सुरक्षा-समितींत उपस्थित केला. ४ ऑगस्ट १९४७ रोजीं समितीनें डचांस युद्धतहकुबीचा आदेश दिला, व याची तंतोतंत अंमलबजावणी होते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं एक सदिच्छा-मंडळ इंडोनेशियांत रवाना केलें. याच सदिच्छा मंडळाकडे तडजोडीनें डच–इंडोनेशिया भांडण मिटविण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली होती. या मंडळानें दोन्ही पक्षांशीं बराच काळ वाटाघाटी करून दोन्ही पक्षांत एक करार करण्यांत यश मिळविलें. हाच रेनेव्हिल करार होय. या करारावर १७ जानेवारी १९४८ रोजीं सह्या झाल्या.

## रेनेव्हिल करार

या करारांत कोणत्या तत्त्वांवर डच व इंडोनेशिया यांत वाटाघाटी व्हाव्या हें सांगण्यांत आलें होतें. या करारान्वयें इंडोनेशियन जनतेचें

स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें होतें. बाकी सर्व अटी लिंगरजेठी करारांतीलच होत्या. एक अट मात्र अगदीं नवीन होती. वादग्रस्त प्रदेशांतील जनतेचें मत सार्वमत घेऊन अजमावावें ही ती अट होय. करार झाल्यावर सहा महिन्यांनंतर पण एक वर्षाच्या आत हें सार्वमत घेतलें पाहिजे अशीहि त्यांत अट घालण्यांत आली होती. या बाबतींत जरूर तो मतप्रचार व चळवळ करावयास त्या त्या प्रदेशांतील जनतेस मुभा दिली जावी हें तत्त्व डचांनीं मान्य केलें होतें.

आपल्या प्रदेशांतील कांहीं भाग तोडावयास प्रजासत्ताकाच्या पुढाऱ्यांनीं मोठ्या मिनतवारीनें मान्यता दिली होती. करारांतील या अटीमुळें नव्या सरहद्दीपलीकडील आपली सर्व सेना प्रजासत्ताकानें मागें घेतली. प्रजासत्ताकाच्या दृष्टीनें जरी हा करार तोटयाचा झाला असला तरी डचांनीं त्यांतील तत्त्वांस प्रामाणिकपणें मान्यता दिली असती तर इंडोनेशियाचा सर्वच प्रश्न सलोख्यानें सुटला असता. अखिल इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यास व इंडोनेशियन संयुक्त राज्याच्या निर्मितीस या करारांतील कलमान्वयें डच बांधलेले होते. डच सेना असलेल्या प्रदेशावरील ताबा प्रजासत्ताकास सक्तीनें सोडावा लागला तरी या प्रदेशांत होणाऱ्या सार्वमताच्या आशेनें प्रजासत्ताकानें ही माघार घेतली होती. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदिच्छामंडळाच्या देखरेखीखालीं हें सार्वमत होणार हाहि प्रजासत्ताकाच्या दृष्टीनें एक आशेचा किरण होता. निःपक्षपातीपणानें हें सार्वमत घेण्यांत आलें असतें तर डचांच्या ताब्यांतील जनतेनें प्रजासत्ताकाच्या बाजूनें मतदान केलें असतें याबद्दल प्रजासत्ताकाच्या पुढाऱ्यांस शंका नव्हती.

मध्यंतरीच्या काळांत डचांनीं आपले खरे हेतु उघड करावयास सुरुवात केली. मॅलिनो योजना त्यांच्या डोक्यांत घोळत होती हेंहि नंतरच्या घडामोडींवरून सिद्ध होतें. करारांतील कलमांचा भंग करून प्रजासत्ताकाकडून

बळकावलेल्या प्रदेशांत डचांनीं मदुरा, पासुंदन व पूर्व सुमात्रा अशीं तीन नवीं राज्यें निर्माण केलीं.

हीं तीन राज्यें निर्माण करतांना डचांनीं वाटेल त्या मार्गाचा अवलंब केला होता. मदुरा बेटावरील धान्यपरिस्थिति गंभीर आहे व तेथील जनतेनें आपणास साह्यास बोलाविलें आहे असा बकवा करून डचांनीं मदुरा बेटाचा ताबा घेतला. सुरक्षा-समितीच्या सदिच्छा-मंडळानें याबाबत चौकशी करून मदुरा बेटातील धान्यपरिस्थिति गंभीर नव्हती असें जाहीर केलें आहे. या राज्याची स्थापना २५–२६ एप्रिल १९४८ रोजीं करण्यांत आली. त्याआधीं तेथील १९२ प्रमुख पुढाऱ्यांस अटक करण्यांत आली होती. प्रमुख पुढाऱ्यांस अटक झाल्यानंतर झालेल्या निवडणुकींत प्रजासत्ताकाच्या बाजूचे ७५ टक्के लोक निवडून आले होते. यामुळें १२ मे रोजीं डचांनीं फिरून धरपकड करून ४० पुढाऱ्यांस अटक केली. पश्चिम जावामधील पासुंदन राज्याची स्थापना डचांनीं फेब्रुवारी १९४८ मध्यें केली. यासाठीं बाडुंग येथें तीन परिषदा बोलाविण्यांत आल्या. पहिल्या दोन परिषदांस सर्व सभासद डचांनीं नेमलेले होते. तिसऱ्या परिषदेच्या १०० प्रतिनिधींपैकीं ५३ निवडलेले होते. निवडणुकी जाहीर करण्यापासून प्रत्यक्ष निवडणुकी होईपर्यंतचा सर्व कार्यक्रम घाईघाईनें अवघ्या १५ दिवसांत उरकून घेण्यांत आला ! अशाच प्रकारें दडपशाही करून पूर्व सुमात्राची निर्मिति करण्यांत आली.

इंडोनेशियांत अनेक वेगळीं राज्यें निर्माण करून प्रजासत्ताकास हाणून पाडावयाचें हा डचांचा प्रथमपासूनचा डाव होता. लिंगरजेटी करार झाल्या-वर पूर्व इंडोनेशिया, पूर्व बोर्निओ व पश्चिम बोर्निओ हीं तीन राज्यें डचांनीं स्थापन केलीं. या तीन राज्यांच्या निर्मितीची कथाहि वरीलप्रमाणेंच आहे. जपानी सेनेनें माघार घेतल्यावर जावा, सुमात्रा, मदुरा या तीन

बेटांवर प्रजासत्ताकाची सत्ता पक्की झाल्याचें डचांच्या निदर्शनास आलें. यामुळें प्रथम इतर भागांवर आपली सत्ता स्थापन करावयाच्या मार्गे डच राजकारणी लागले. या भागांत प्रजासत्ताकाची सुसज्ज सेना नसल्यामुळें डचांना तेथें आपली अधिसत्ता स्थापन करणें सोपें गेलें. राष्ट्रीय फौजेचा जो कांहीं थोडासा प्रतिकार झाला तो डचांच्या कॅप्टन वेस्टरलिंग यानें अनन्वित अत्याचार करून मोडून काढला. साऊथ सेलेबसमध्यें या लढायांत ४०,००० लोक मरण पावले. शेंकडो देशभक्तांना तुरुंगांत डांबून टेवण्यांत आलें, सर्व राजकीय पक्ष बेकायदा ठरविण्यांत आले. एवढी तयारी झाल्यावर डिसेंबर १९४६ मध्यें बाली बेटांवरील डेनपासूर येथें एक परिषद बोलविण्यांत येऊन ईस्ट इंडोनेशियन राज्याची स्थापना करण्यांत आली. या परिषदेचे सर्व प्रतिनिधी डचांनींच निवडले होते. मोठे जमीनदार व सुलतान यांच्या सहकार्यानें पूर्व व पश्चिम बोर्निओ राज्याची अशीच स्थापना करण्यांत आली. रेनेव्हिल करार झाल्यावर प्रजासत्ताकाच्या प्रदेशांत मदुरा, पासुंदन व पूर्व सुमात्रा या तीन राज्यांची स्थापना करण्यांत आली.

हीं वेगळी स्वायत्त राज्यें स्थापन झाल्यामुळें त्या भागांत राष्ट्रीयत्वाची भावनाच वाढली नव्हती असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पूर्व इंडोनेशियांत सर्व राष्ट्रीय संघटनांनीं आपली जोरदार अशी एक संयुक्त आघाडी बनविली होती. बांडुइंग परिषदेस या आघाडीतर्फे एकहि प्रतिनिधि पाठविण्यांत आला नव्हता. पूर्व इंडोनेशियन पार्लमेंटनेहि या परिषदेस प्रतिनिधि पाठविण्याच्या सरकारी धोरणाबद्दल नापसंती व्यक्त केली होती. जनतेच्या असहकारामुळें पूर्व बोर्निओंत पार्लमेंट स्थापन करणें अशक्य झालें याची खुद्द डचांनींच कबुली दिली होती. मदुरा बेटावर एप्रिल १९४८ मध्यें झालेल्या निवडणुकींत ३७ पैकीं २८ जागा प्रजासत्ताकाच्या बाजूच्या पक्षांनीं जिंकल्या होत्या. पासुंदन राज्यांत राजप्रमुख, पंतप्रधान व प्रधानमंडळांतील निम्मे सभासद प्रजासत्ताक गटाचे होते.

पूर्व सुमात्रांत प्रजासत्ताक गटास मंत्रिमंडळांतच घेण्यांत आलें नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रचार व चळवळ करण्यासाठीं या गटानें पूर्व सुमात्रा राष्ट्रीय आघाडी स्थापन केली.

अशा रीतीनें इंडोनेशियन भूमीवर सहा वेगळीं राज्यें निर्माण होत असतांना रेनेव्हिल कराराच्या अंमलबजावणीबाबत डच व इंडोनेशियन प्रजासत्ताकाचे प्रतिनिधी यांत वाटाघाटी चालूंच होत्या. मदुरा, पासुंदन व पूर्व सुमात्रा या राज्यांचे स्थापनेस प्रजासत्ताकाच्या प्रतिनिधींनीं जोरदार विरोध केला नाहीं असें कम्युनिस्ट व अमीर सुजाफुद्दिन यांच्या समाजवादी पक्षांचें म्हणणें होतें. शेवटीं या दोन्ही गटांनीं एक होऊन नोव्हेंबर १९४८ मध्यें प्रतिस्पर्धी सरकार स्थापलें. या वेळीं प्रजासत्ताकाच्या पुढाऱ्यांनीं कमालीची कार्यक्षमता दाखवून हें बंड एक आठवड्यांत मोडून काढलें. मात्र या बंडामुळें प्रजासत्ताकाची फळी फुटली व सामर्थ्य कमी झालें ही गोष्ट खरी आहे. याचाच फायदा घेऊन डचांनीं वाटाघाटी मोडल्याचें निमित्त करून १८–१९ डिसेंबर १९४८ रोजीं प्रजासत्ताकाच्या प्रदेशावर सर्व बाजूंनीं हल्ला चढविला. यासच डच सरकार आपली 'पोलिशी कारवाई' असें म्हणतें. पहिल्याच धडाक्यास जोगजाकार्ता काबीज करून डचांनीं प्रजासत्ताकाच्या सर्व पुढाऱ्यांस पकडलें व बंका बेटावर स्थानबद्ध करून ठेवलें. एक आठवड्याच्या आंतच आपली 'पोलिशी कारवाई' यशस्वी झाली असल्याचें डचांनीं जगाला घोषित केलें.


प्रजासत्ताकाच्या प्रमुख पुढाऱ्यांनीं आपणास अटक होण्यापूर्वीं डॉ. सफ्रुद्दिन प्रविरंगारा यांचे नेतृत्वाखालीं एक तात्पुरतें भूमिगत सरकार स्थापन केलें होतें. या सरकारनें प्रजासत्ताकाच्या सेनेचें गनिमी सेनेंत रूपांतर केलें. आपल्या ताब्यांतील चार प्रांतांत लष्करी गव्हर्नरांची नेमणूक केली. त्यांच्या दिमतीस मिलिटरी रेसिडेंट, मिलिटरी रीजंट्स् व मिलिटरी कंट्री स्टाफ

देण्यांत येऊन आपापल्या भागापुरती त्यांस संपूर्ण स्वायत्तता देण्यांत आली. या सरकारनें डचांशीं संपूर्ण असहकार जारी केला. या भूमिगत सरकारच्या हालचालींमुळें प्रजासत्ताकाच्या ताब्यांतील प्रमुख शहरांचाच डचांस ताबा घेतां आला. खेडोपाडीं ग्रामीण विभागांत खरी सत्ता प्रजासत्ताकाचीच होती. या गनिमी सैनिकांनीं डच सैन्यास सळो कीं पळो करून सोडलें. गनिम्यांच्या हातून डच सेनेचा ठिकठिकाणीं पराभव होऊं लागला. शेवटीं १४ फेब्रुवारी १९४९ रोजीं या भूमिगत सरकारनें आपल्या रेडिओवरून डचांस पुढील अटी सुनावल्या : ( १ ) लिंगरजेठी करारानें मान्य केलेल्या प्रदेशावर प्रजासत्ताकाची पुनस्थापना, ( २ ) इंडोनेशियन जनतेच्या संमतीनें संघराज्याची स्थापना, व ( ३ ) संघराज्याच्या घटनेसाठीं घटना समिति.

डचांच्या या आक्रमणाविरुद्ध प्रजासत्ताकाबाहेरच्या प्रदेशांत बंडें व प्रचंड निदर्शनें झालीं. या आक्रमणाच्या निषेधार्थ कांहीं राज्यांतील मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. इतर राज्यांतील संघराज्यवादी पुढाऱ्यांनींहि प्रजासत्ताकाचा पाठपुरावा केला. स्पेशल फेडरल कन्सल्टेटिव्ह बोर्डानें जोगाकार्ता येथें प्रजासत्ताकाची स्थापना करण्यांत यावी असा ठराव केला. यामुळें सर्व इंडोनेशियांत एक प्रकारची संयुक्त फळी निर्माण झाली. १० फेब्रुवारी १९४९ रोजी मकासार येथें प्रजासत्ताकाबाहेरील सर्व राजकीय पक्षांची एक परिषद झाली. या परिषदेनें खालील ठराव केलेः—( १ ) अखिल इंडोनेशियांतील प्रजासत्ताक चळवळीचें सोकार्नो-हाटा सरकार हें प्रतीक आहे. यामुळें प्रजासत्ताकाचें लढ्यास मारक ठरेल अशी कोणतीच योजना ही परिषद मान्य करणार नाही. ( २ ) या प्रकरणीं सुरक्षा-समितीनें मध्यस्थी करावी व प्रजासत्ताक, डच व सुरक्षा-समितीचें सदिच्छा-मंडळ यांनीं सुरक्षा-मंडळाच्या ठरावाची अंमलबजावणी करावी. इंडोनेशियांतलि इतर राष्ट्रांनीं सुरक्षा-समितीच्या ठरावांप्रमाणें वागावें.

डचांच्या या हल्लयानें इंडोनेशियांत अंतर्गत एकजूट व्हावयास मदत झाली असली तरी त्यानें इंडोनेशियाचा प्रश्न सुटला नसता. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत डचांच्या या आक्रमणाचा बराच गाजावाजा झाला. हिंदुस्थान, पाकिस्तान या राष्ट्रांनीं आपल्या प्रदेशावरून इंडोनेशियांत जाणाऱ्या डच विमान कंपनीचा परवाना रद्द केला व डच विमानवाहतूक बंद पाडली. हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया यांनीं डच आक्रमणाचा प्रश्न सुरक्षा-समितींत उपस्थित केला. हिंदुस्थानचे परराष्ट्रमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं डचांच्या साम्राज्यशाही आक्रमणाचा निषेध करण्यासाठीं दिल्लीस आशियांतील राष्ट्रांची एक परिषद बोलाविली. ही परिषद २२-२३ जानेवारी रोजीं दिल्लीस पंडित नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडली. या परिषदेंत सर्व जगाची एकूण निम्मी लोकसंख्या असलेल्या १९ राष्ट्रांनीं भाग घेतला होता. आज इंडोनेशियाचा प्रश्न सुटला असला, तर त्याचा बराच मोठा वांटा दिल्लीस भरलेल्या या इंडोनेशियन परिषदेकडे जातो. या परिषदेनें घालून दिलेल्या तारखेस इंडोनेशिया स्वतंत्र झाला.

दिल्ली परिषदेंत करण्यांत आलेल्या ठरावांत डचांचा हल्ला म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेचा उघडउघड भंग होय हें दाखवून दिलें होतें. शेवटीं प्रजासत्ताकाचे पुढारी व इतर राजबंदी यांची तात्काळ मुक्तता करण्यांत यावी; जोगजाकार्ता येथें प्रजासत्ताकाची पुनर्स्थापना करण्यांत यावी; १८ डिसेंबरला प्रजासत्ताकाच्या ताब्यांत असलेला प्रदेश १५ मार्च १९४९ पर्यंत प्रजासत्ताकाच्या स्वाधीन करण्यांत यावा; प्रजासत्ताकाच्या व्यापारावरील सर्व निर्बंध उठविण्यांत यावेत; १५ मार्चपर्यंत सबंध इंडोनेशियांत तात्पुरतें सरकार स्थापन करण्यांत यावें; १ ऑक्टोबर १९४९ पूर्वीं घटना-समितीच्या निवडणुकी घ्याव्या; व १ जानेवारी १९५० पूर्वीं सर्व अधिसत्ता ( सॉव्हरेन्टी ) इंडोनेशियन संघराज्याकडे सुपूर्द करावी अशा


इंडोनेशियाचें
संघराज्य
फिलिपाईन्स
इंडोचायना
मलाया
मेडन
सु मा त्रा
पाडंग
पालेबंग
मदुरा
ब्रि. बोर्निया
बो र्नि यो
सेलबस
मकास्सार
जोकजाकर्ता
सोरबाया
जा. वा
बांडुंग
जोगाकर्ता
बाली
न्यूगिनी

डचांकडे मागण्या करणारा ठराव पास करण्यांत आला. सुरक्षा–मंडळानें या प्रकरणीं तात्काळ लक्ष घालून आपल्या देखरेखीखालीं हें सत्तासंक्रमण घडवून आणावें अशी सुरक्षा समितीस विनंती करण्यांत आली.

सुरक्षा समितींत हा प्रश्न बराच काळ चर्चिला गेला पण त्यावर निकाली निर्णय दिल्ली परिषदेनंतरच २८ जानेवारी रोजीं घेण्यांत आला. या वेळीं सुरक्षा समितीनें एक ठराव करून सदिच्छा मंडळास 'इंडोनेशियन कमिशन'चा दर्जा दिला. डचांनीं आपल्या लष्करी हालचाली व प्रजासत्ताकंवाद्यांनीं आपल्या गनिमी हालचाली तावडतोब थांबवाव्या अशा दोन्ही पक्षांस आदेश देण्यांत आला. जोगाकार्ताला तावडतोब प्रजासत्ताकाची स्थापना करण्यांत यावी, २५ मार्चपर्यंत सबंध इंडोनेशियाचें तात्पुरतें सरकार स्थापन करण्यांत यावें, १ ऑक्टोबर १९४९ पर्यंत घटनासमितीच्या निवडणुका व्हाव्या, व इंडोनेशियन संघराज्याकडे १ जुलै १९५० च्या आंत सर्व अधिसत्ता द्यावी अशी डचांना विनंति करण्यांत आली. सुरक्षा-मंडळाच्या या ठरावाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं डचांना प्रजासत्ताकाची जोगाकार्ताला तावडतोब स्थापना करा व सर्व प्रकारच्या लष्करी हालचाली थांबवा अशी तंबी देणारा ठराव सुरक्षा–मंडळानें २३ मार्च १९४९ च्या बैठकींत मंजूर केला. याच ठरावांत डच व इंडोनेशियन्स यांतील इतर वाद मिटविण्यासाठीं इंडोनेशियन कमिशनच्या मार्गदर्शनाखालीं हेगला एक प्रातिनिधिक गोलमेज परिषद भरवावी अशीहि डचांना विनंती करण्यांत आली.

## रोएन–रूम करार

अशा प्रकारच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय दडपणामुळें व इंडोनेशियन जनतेच्या गनिमी प्रतिकारामुळें डचांनीं इंडोनेशियाबाबत नवें धोरण अवलंबावयाचें ठरविलें. आपण निर्माण केलेलीं स्वायत्त राज्यें व इंडोनेशियन

प्रजासत्ताक यांचें एक संघराज्य निर्माण करणें ही या धोरणाची परिणति होती. हें संघराज्य व नेदरलँड्स् यांचें एक 'युनियन' करण्याचीहि कल्पना त्यामागें होती. यामुळें प्रजासत्ताकांतील डाव्या गटांनीं या प्रकारच्या तड-जोडीस विरोध दर्शविला व युद्धतहकुबीस विलंब लावला. आपल्या नव्या धोरणानुसार प्रजासत्ताकाच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करण्यास डच सरकारनें डॉ. फॉन रोएन या पुरोगामी व दूरदृष्टीच्या मुत्सद्द्यास पाठविलें. सह-कार्यानेंच इंडोनेशियनांस जिंकून घेता येईल असें या पुढाऱ्याचें मत होतें, व शेवटीं त्याचाच विजय झाला. झालें गेलें विसरून नव्या धडाडीनें व विधायक दृष्टिकोनानें नवी घडी बसवावी या मताच्या डॉ. रूम या तरुण इंडोनेशियनाकडे प्रजासत्ताकाच्या वतीनें वाटाघाटी करण्याची कामगिरी आली. या दोघांनीं इंडोनेशियन कमिशनच्या दिग्दर्शनाखालीं वाटाघाटी करून एक करार केला. जोगाकार्तोला प्रजासत्ताकाची पुनर्स्थापना झाल्यावर युद्धतहकुबी अमलांत यावी व त्यानंतर हेग परिषदेबाबत वाटा-घाटी कराव्या अशा तऱ्हेचा हा रोएन—रूम करार होता. या करारान्वयें १ जुलैला जोगाकार्तोला प्रजासत्ताकाची पुनः स्थापना करण्यांत आली.

मध्यंतरीच्या काळांत बदललेल्या परिस्थितीचा आढावा घेऊन प्रजा-सत्ताकाच्या पुढाऱ्यांनीं हेगला भरणाऱ्या परिषदेच्या वेळीं संयुक्त फळी निर्माण करण्याच्या दृष्टीनें हालचाली करावयास सुरुवात केली. या बाबतींत इंडोनेशियन कमिशनच्या सदस्यांनीं व डॉ. फॉन रोएन यांनीं प्रजा-सत्ताकाच्या पुढाऱ्यांस बरीच मदत केली. शेवटीं प्रथम जोगाकार्तो येथें व दुसरी बटाव्हिया येथें अशा प्रजासत्ताकवादी व इतर राज्यांचे संघराज्यवादी पुढारी यांच्या दोन परिषदा होऊन हेगला सर्वांनीं मिळून एकमतानें वागावयाचा निर्णय घेण्यांत आला. या वाटाघाटी ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत चालू होत्या. शेवटीं भावी इंडोनेशियन संघराज्याची रूपरेखा आंखण्यांत आली.

नव्या राज्याला ‘ रिपाब्लिक इंडोनेशिया शारिकत ’ म्हणावें असें ठरविण्यांत आलें. इंडोनेशियन भाषेंत शरिकत याचा अर्थ ‘संघराज्य’ असा होतो. प्रजासत्ताकाचा तांबडा व पांढरा झेंडा नव्या राज्याचा राष्ट्रध्वज असावा; प्रजासत्ताकाचें ‘ इंडोनेशिया राया ’ हें राष्ट्रगीत नव्या राज्याचें राष्ट्रगीत असावें व प्रजासत्ताकाची नवी ( भाषा इंडोनेशिया ) ही राष्ट्रभाषा व्हावी हें मान्य करण्यांत आलें. या नव्या संघराज्याचे पूर्व इंडोनेशिया ( सेलेबस व इतर लहान बेटें), बोर्निओ व प्रजासत्ताक (जावा, सुमात्रा, मदुरा व इतर बेटें) असे तीन घटक असावे. प्रजासत्ताकाच्या ताब्यांत नक्की कोणते प्रदेश असावेत हे रेनेव्हिल करारातील कलमांप्रमाणें एका कमिशननें ठरवावें अशी या बाबतींत तडजोड काढण्यांत आली.

याच परिषदेंत भावी संघराज्याच्या तात्पुरत्या घटनेबाबत चर्चा होऊन एक योजना आंखण्यांत आली. घटना-समितीची निवडणूक होऊन नवी घटना निर्माण होईपर्यंतच्या काळांत १५० सभासदांचें एक हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज व सर्व घटकाना सारखें प्रतिनिधित्व असलेलें सीनेट अशीं दोन कायदेमंडळें राहतील. सिनेटचें स्वरूप सल्लागार मंडळासारखें राहणार असलें तरी घटक-राज्यें व संघराज्य यांच्या परस्परसंबंधांबाबत कायदे करण्याचा सीनेटला अधिकार ठेवण्यांत आला आहे. हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजनें रिपाब्लिक इंडोनेशिया शारिकतचा अध्यक्ष निवडावयाचा आहे. हा अध्यक्ष घटनात्मक प्रमुख राहून सर्व राज्यकारभार या हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजला जबाबदार असलेलें मंत्रिमंडळ पाहील. मुख्य प्रधान व त्याचे तीन प्रमुख सहकारी यांची निवड अध्यक्ष करील व हे चौघे मंत्री मिळून इतर मंत्रिमंडळ निवडतील. चार प्रमुख मंत्र्यांकडे संरक्षण, परराष्ट्र-संबंध, अर्थव्यवहार व गृहखातें हीं खातीं राहतील. आणीबाणीच्या वेळीं या चार मंत्र्यांचें सुपर कॅबिनेट होईल.

९१८९
3913/49



नव्या संघराज्यास सर्वतोपरी सत्ता डचांकडून मिळणार नसून प्रजासत्ताकाकडून मिळणार आहे. यामुळें संघराज्य अस्तित्वांत आल्यावर प्रजासत्ताकानें निर्माण केलेले परराष्ट्रसंबंध आपोआप नाहींसे होतील. संघराज्यासाठीं एकच लष्कर राहील. संघराज्याचा अध्यक्ष हा या लष्कराचा सर्वश्रेष्ठ अधिपति राहील. प्रजासत्ताकाचें लष्कर व इतर राज्यांतली रॉयल इंडोनेशियन आर्मी यांचें मिळून हें लष्कर राहील.

अशा रीतीनें प्रजासत्ताकवादी व संघराज्यवादी यांतील वाटाघाटी अत्यंत एकोप्यानें संपल्या. सर्व वाटाघाटी सलोख्याच्या व भ्रातृत्वाच्या वातावरणांत झाल्या. जोगजाकार्ता येथें या वाटाघाटी चालू असतां संघराज्यवादी शिष्टमंडळाचे नेते सुलतान हमीद यांनीं एकदां प्रजासत्ताकाचा राष्ट्रध्वज हातांत घेऊन एका मिरवणुकीचें नेतृत्व पत्करलें होतें! बटाव्हिया येथील वाटाघाटीच्या वेळीं एकदां जमावानें डॉ. हाटा यांना खांद्यावर घेऊन त्यांची मिरवणूकच काढली होती.

हाच एकोपा २३ ऑगस्टला हेगला सुरू झालेल्या गोलमेज परिषदेच्या वेळीं टिकला. या गोलमेज परिषदेस तीनशेंच्यावर प्रतिनिधी, तज्ञ, सल्लागार हजर होते. डॉ. मुहंमद हाटा हे प्रजासत्ताकवादी शिष्टमंडळाचे नेते होते, वं फेडरल कन्सल्टेटिव्ह ग्रूपचे अध्यक्ष सुलतान हमीद हे संघराज्यवादी प्रजासत्ताकाचे नेते होते. सुरवातीलाच परिषदेंत निरनिराळ्या उपसमित्या नेमण्यांत आल्या, १ नोव्हेंबर १९४९ रोजीं झालेल्या शेवटच्या अधिवेशनांत न्यू गिनीशिवाय बाकी सर्व प्रश्नांवर एकमत झालें असल्याचें जाहीर करण्यांत आलें व करारावर प्रजासत्ताक संघराज्यवादी व डच प्रतिनिधिमंडळाचे नेते व युनोच्या इंडोनेशिया कमिशनच्या तीन सभासदांच्या सह्या झाल्या. इंडोनेशिया कमिशनच्या या करारावर सह्या झाल्यामुळें करारास आपोआप आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. या कराराप्रमाणें डचांनीं नव्या संघराज्याकडे सर्वतोपरी सत्ता ३० डिसेंबर १९४९ पर्यंत द्यावयाचें कबूल केलें असून

१ जानेवारी १९५० रोजीं नवें संघराज्य अस्तित्वांत येईल. न्यूगिनीच्या प्रश्नाबाबत नवें संघराज्य व डच सरकार यांत एक वर्षानंतर फिरून वाटाघाटी व्हावयाच्या आहेत. नवें संघराज्य स्थापन झाल्यावर सहा महिन्यांत डच सेना काढून घेतली जावयाची आहे.

---

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ८२००९
विभाग वा. वा.
९९८९
नों. दि. ३१/३/
शाखा

म. ग्रं. सं. ...
बा. क्र. ३२०७
वि. वा. वा.

IRBK-0103281
IRBK-0103281